प्रकरण पाचवे

# माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

५.१ प्राचार्यांकडून मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

५.२ शिक्षकांकडून मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

प्रकरण – पाचवे

## माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन –

मागील प्रकरण चारमध्ये संशोधन कार्यपद्धतीविषयी सविस्तर चर्चा केली आहे. यामध्ये संशोधन पद्धती, साधने, संशोधन ओघतक्ता इत्यादीविषयी विवेचन दिले आहे.

प्रस्तुत प्रकरण पाचमध्ये कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडून मुलाखतीद्वारे व शिक्षकांकडून प्रश्नावलीद्वारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यात आले आहे.

या प्रस्तुत प्रकरणामध्ये दोन विभाग करण्यात आले आहेत. पहिल्या विभागामध्ये मुलाखतीद्वारा प्राचार्यांकडून मिळालेलया माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करुन निष्कर्ष काढण्यात आले आहे. तर विभाग दुसऱ्यामध्ये शिक्षकांकडून प्रश्नावलीद्वारा मिळालेल्या माहितीचे विश्लेषण, अर्थनिर्वचन करुन निष्कर्ष काढण्यात आले आहे. याची सविस्तर माहिती या पाचव्या प्रकरणात दिली आहे.

### विभाग – १

प्राचार्यांच्याकडून मुलाखतीद्वारा मिळालेल्या माहितीच्या आधारे विश्लेषण व अर्थनिर्वचन पुढीलप्रमाणे कोष्टक रुपाने व विश्लेषण रुपाने दिले आहे.

**कोष्टक क्र. ५.१**

**प्रति.सादक प्राचार्यांच्या शैक्षणिक अर्हतेविषयी वर्गीकरण**

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | प्रति.सादक प्राचार्य संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | M.A., B.Ed. | ३ | ६०% |
| २. | M.Com. B.Ed. | १ | २०% |
| ३. | B.A.B.Ed., B.P.Ed. | १ | २०% |
| | एकूण | ५ | १००% |

MAR. BA... ...KAR LIBRARY
SHIVAJI ... KOLHAPUR

**निरीक्षण –**

वरील कोष्टकावरुन असे दिसून यते की प्रति.सादक प्राचार्य एम.ए.बी.एड. ३ (६०%), एम.कॉम. बी.एड – १ (२०%) व बी.ए. बी.एड. बी.पी.एड १ (२०%) होते.

**अन्वयार्थ –**

यावरून असे दिसून येते की, पाच पैकी ४ प्राचार्य हे पदव्युत्तर होते. व एक प्राचार्य पदवी प्राप्त होते. कनिष्ठ महाविद्यालयोच प्राचार्य हे पदव्युत्तर असावेत. पाचपैकी चार हे (८०%) प्राचार्य हे आवश्यक ती शैक्षणिक पात्रता धारण केलेले होते. तर १ (२०%) प्राचार्य आवश्यक ती शैक्षणिक पात्रता धारण न करणारे होते.

**निष्कर्ष –**

पाचपैकी चार प्राचार्य पदव्युत्तर तर एक पदवीधारक आहेत.

**कोष्टक क्र. ५.२**

**शिक्षक म्हणून अनुभवाचे वर्गीकरण**

| अ.क्र. | अनुभव वर्ष (वारंवारिता) | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | १ ते ५ | ० | ००% |
| २. | ६ ते १० | ० | ००% |
| ३. | ११ ते १५ | १ | २०% |
| ४. | १६ ते २० | २ | ४०% |
| ५. | २१ ते २५ | १ | २०% |
| ६. | २६ ते ३० | १ | २०% |
| | एकूण | ५ | १००% |

**निरीक्षण –**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की १ ते १० वर्षे शिक्षक म्हणून अनुभव असणारे प्राचार्य नव्हते. तर १५ ते १० वर्षे शिक्षक म्हणून अनुभव असणारे प्राचार्य नव्हते. तर १५ वर्षे अनुभव असणारे १ (२०%) तसेच १६ ते २० वर्षे शिक्षक म्हणून अनुभव असणारे दोन

(४०%) प्राचार्य होते. तसेच २१ ते २५ वर्षे व २६ ते ३० वर्षे शिक्षक म्हणून अनुभव असणारे प्रत्येक एक (२०%) प्राचार्य होते.

**अन्वयार्थ –**

वरील माहितीवरुन असे लक्षात येते की सध्या प्राचार्य म्हणून काम करत असलेल्या प्राचार्यांना शिक्षक म्हणून अध्यापनाचा अनुभव हा आवश्यकतेनुसार आहे. यापैकी तीन प्राचार्यांना २० पेक्षा कमी तर २ प्राचार्यांना २० पेक्षा जास्त वर्षे अनुभव आहे.

**निष्कर्ष –**

सर्व प्राचार्यांना शिक्षक म्हणून अनुभव हा १५ वर्षेपेक्षा जास्त आहे.

**कोष्टक क्र. ५.३**

**प्रति.सादक प्राचार्यांच्या अनुभवाचे वर्गीकरण**

| अ.क्र. | अनुभव वर्ष (वारंवारिता) | प्राचार्य संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | १ ते ५ | २ | ४०% |
| २. | ६ ते १० | २ | ४०% |
| ३. | ११ ते १५ | १ | २०% |
| ४. | १६ ते २० | ० | ००% |
| | एकूण | ५ | १००% |

**निरीक्षण –**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, १ ते ५ वर्षे अनुभव असणारे प्राचार्य २ (४०%) होते, ६ ते १० वर्षे प्राचार्य पदाचा अनुभव असणारे २ (४०%) प्राचार्य होते. तर ११ ते १५ वर्षे च्या दरम्यान अनुभव असणारे १ (२०%) प्राचार्य होते.

**अन्वयार्थ –**

वरील माहितीवरुन असे दिसून येते की १ ते ५ व ६ ते १० वर्षे प्राचार्य पदाचा अनुभव असणारे प्रत्येकी दोन – दोन प्राचार्य होते. आणि १५ पेक्षा जास्त वर्षे अनुभव एका प्राचार्यास

होता. पण त्यांना शिक्षक म्हणून असणारा अनुभव हा १५ वर्षे पेक्षा जास्त होता. त्यामुळे त्यांना अध्यापनासंदर्भात, प्रशासन & नियोजनासंदर्भातील येणाऱ्या समस्या सोडवता येतात.

**निष्कर्ष –**

जवळ – जवळ सर्व प्राचार्यांना प्राचार्य पदाचा अनुभव हा दहा वर्षे पर्यंतचा आहे.

**प्रत्येक वर्गात किती विद्यार्थी संख्या आहे ?**

**कोष्टक क्र. ५.४**

**इयत्ता ११ वी १२ वी एकूण विद्यार्थी संख्येचे वर्गीकरण**

| अ. क्र. | कॉलेजचे नांव | इयत्ता | कला | वाणिज्य | शास्त्र | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | कर्मवीर भाऊराव पाटील कनिष्ठ महाविद्यालय | ११ वी<br>१२ वी | ५३०<br>४५० | १९०<br>१५४ | ६५०<br>५२० | १३७०<br>११२४ |
| २. | उमा कनिष्ठ महाविद्यालय | ११ वी<br>१२ वी | १२०<br>९५ | ९०<br>११० | १४०<br>८८ | ३५०<br>२९३ |
| ३. | विवेकवर्धिनी कनिष्ठ महाविद्यालय | ११ वी<br>१२ वी | २००<br>१७० | ९०<br>१०० | २६४<br>१८० | ५५४<br>४५० |
| ४. | वामनराव माने कनिष्ठ महाविद्यालय | ११ वी<br>१२ वी | १८०<br>१७२ | ११२<br>११० | १४१<br>१०७ | ४३३<br>३८९ |
| ५. | विठ्ठल कनिष्ठ महाविद्यालय | ११ वी<br>१२ वी | १३०<br>११० | --<br>-- | १२५<br>१०८ | २५५<br>२१८ |
| | एकूण | ११ वी<br>१२ वी | २१५७ | ९५६ | २३२३ | ५४३६ |
| | शेकडा प्रमाण | ११ वी<br>१२ वी | ३९.६७ | १७.५८ | ४२.७३ | १०० |

**निरीक्षण –**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, पंढरपूर शहरातील कनिष्ठ महविद्यालयामध्ये शिक्षण घेणारे कला शाखेतील २१५७ (३९.६७%) विद्यार्थी आहेत. तसेच वाणिज्य

शाखेमध्ये शिकत असलेले ९५६ (१७.५८%) विद्यार्थी असून शास्त्र शाखेमध्ये शिकत असलेले २३२३ (४२.७३ %) विद्यार्थी आहेत.

**अन्वयार्थ -**

यावरुन असा अन्वयार्थ लावता येतो की, पंढरपूर शहरामधील कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचा सर्वात जास्त कल हा शास्त्र शाखेकडे आहे. तर वाणिज्य शाखेमधून शिक्षण घेण्याचा कल तुलनेने फारच कमी (१७.५८ %) आहे.

**निष्कर्ष -**

पंढरपूर शहरातील कनिष्ठ महाविद्यालयांमधून शिक्षण घेणारे सर्वांत जास्त शास्त्र शाखेचे विद्यार्थी आहेत.

**आपल्या कनिष्ठ महाविद्यालयामध्ये कोणकोणत्या शाखा आहेत.**

**कोष्टक क्र. ५.५**

**शाखांविषयीच्या माहितीचे वर्गीकरण**

| अ.क्र. | शाखा | प्रति.सादक संख्या | प्रति.. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | कला | ०० | ०० |
| २. | कला व शास्त्र | ०१ | २०% |
| ३. | कला, वाणिज्य व शास्त्र | ०४ | ८०% |
| | एकूण | ०५ | १००% |

**निरीक्षण -**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, फक्त कला शाखा असणारी कनिष्ठ महाविद्यालय ०० (००%) आहेत, तर कला व शास्त्र शाखा असणारे ०१ (२०%) व कला, वाणिज्य व शास्त्र शाखा असणारी ०४ (८०%) कनिष्ठ महाविद्यालये आहेत.

**अन्वयार्थ –**

यावरुन असा अन्वयार्थ लावला जातो की, फक्त कला शाखा असणारे एकही कनिष्ठ महाविद्यालय नसून, शास्त्र व कला शाखा असणारे एक व शास्त्र, वाणिज्य व कला या तिन्ही शाखा असणारी ०४ (८०%) कनिष्ठ महाविद्यालये आहेत.

**निष्कर्ष –**

एक कनिष्ठ महाविद्यालय वगळता इतर चारही कनिष्ठ महाविद्यालयामध्ये तिन्हीही शाखा आहेत.

**आपल्या कनिष्ठ महाविद्यालयामध्ये शासकीय नियमानुसार पुरेशी शिक्षक व सेवक संख्या आहे काय ?**

**कोष्टक क्र. ५.६**

**शिक्षक व सेवक संख्येविषयी माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | शाखा | प्रति.सादक संख्या | प्रति.. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय | ०५ | १००% |
| २. | नाही | ०० | ०० |
| | एकूण | ०५ | १००% |

**निरीक्षण –**

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की कनिष्ठ महाविद्यालयामध्ये शासकीय नियमानुसार पुरेशी शिक्षक व सेवक संख्या आहे असे ०५ (१००%) प्राचार्यांनी सांगितले तर ००(००%) प्राचार्यांनी नाही असे सांगितले.

**अर्थनिर्वचन –**

यावरुन असे दिसून येते की कनिष्ठ महाविद्यालयामध्ये शिक्षक व सेवक संख्या ही शासकीय नियमानुसार पुरेशी आहे असे सर्व प्रति.सादक प्राचार्यांचे मत आहे.

**निष्कर्ष –**

पंढरपूर  शहरातील कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये शासकीय नियमानुसार पुरेशी शिक्षक व सेवक संख्या आहे.

**कनिष्ठ महाविद्यालयासाठी विद्यार्थी संख्येच्या गरजेनुसार पुरेशी इमारत आहे काय ?**

**कोष्टक क्र. ५.७**

**विद्यार्थी संख्येच्या गरजेनुसार पुरेशी इमारत आहे का हे दर्शविणारा तक्ता.**

| अ.क्र. | प्रति.सादाचे स्वरुप | प्रति.सादक संख्या | प्रति.. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय | ०३ | ६०% |
| २. | नाही | ०२ | ४०% |
| | एकूण | ०५ | १००% |

**निरीक्षण –**

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, विद्यार्थी संख्येच्या गरजेनुसार पुरेशी इमारत आहे असे ०३ (६०%) प्राचार्यांनी सांगितले तर नाही असे ०२ (४०%) प्राचार्यांनी सांगितले.

**अर्थनिर्वचन –**

यावरुन असे दिसून येते की, पंढरपूर शहरातील ०३ कनिष्ठ महाविद्यालयाला  विद्यार्थी संख्येच्या गरजेनुसार पुरेशी इमारत आहे तर दोन कनिष्ठ महाविद्यालयांना पुरेशी इमारत नाही.

**निष्कर्ष –**

पंढरपूर शहरातील सर्वच कनिष्ठ महाविद्यालयाला विद्यार्थी संख्येच्या मानाने पुरेशी इमारत नाही.

**विद्यार्थी संख्येच्या मानाने आकाराने पुरेसे मोठे वर्ग आहेत का ?**

**कोष्टक क्र. ५.८**

**विद्यार्थी संख्येच्या मानाने पुरेसे मोठे वर्ग आहेत का याविषयीच्या माहितीचे वर्गीकरण**

| अ.क्र. | प्रति.सादाचे स्वरुप | प्रति.सादक संख्या | प्रति.. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय | ०४ | ८०% |
| २. | नाही | ०१ | २०% |
| | एकूण | ०५ | १००% |

**निरीक्षण –**

कोष्टक क्र. ५.८ वरुन असे दिसून येते की विद्यार्थी संख्येच्या मानाने आकाराने पुरेसे मोठे वर्ग आहेत असे ०४ (८०%) प्राचार्यांनी सांगितले तर नाहीत असे ०१(२०%) प्राचार्यांनी सांगितले.

**अर्थनिर्वचन –**

यावरुन असे दिसून येते की, पंढरपूर शहरातील ०४ कनिष्ठ महाविद्यालयातील वर्ग हे आकाराने पुरेसे मोठे आहेत तर एका कनिष्ठ महाविद्यालयातील वर्ग हे विद्यार्थी संख्येच्या मानाने लहान आहेत.

**निष्कर्ष –**

पंढरपूर शहरातील सर्वच कनिष्ठ महाविद्यालयातील वर्ग हे विद्यार्थी संख्येच्या मानाने पुरेसे आकाराने मोठे नाहीत.

## कनिष्ठ महाविद्यालयासाठी स्वतंत्र ग्रंथालय आहे काय ?

**कोष्टक क्र. ५.९**

**कनिष्ठ महाविद्यालयासाठी स्वतंत्र ग्रंथालयाच्या माहितीचे विश्लेषण**

| अ.क्र. | प्रति.सादाचे स्वरुप | प्रति.सादक संख्या | प्रति.. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय | ०४ | ८०% |
| २. | नाही | ०१ | २०% |
| | एकूण | ०५ | १००% |

**निरीक्षण –**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते कनिष्ठ महाविद्यालयासाठी स्वतंत्र ग्रंथालय नाही असे ०४ (८०%) प्राचार्यांनी सांगितले तर एका (२०%) प्राचार्यांनी आहे असे सांगितले.

**अर्थनिर्वचन –**

यावरुन असे दिसून येते की, पंढरपूर शहरातील चार कनिष्ठ महाविद्यालयांसाठी स्वतंत्र असे ग्रंथालय असून एका कनिष्ठ महाविद्यालयासाठी स्वतंत्र ग्रंथालय आहे.

**निष्कर्ष –**

कनिष्ठ महाविद्यालयामध्ये स्वतंत्र ग्रंथालय नाही.

## ग्रथांलय संगणकीकृत केले आहे काय ?

**कोष्टक क्र. ५.१०**

**ग्रंथालयाच्या संगणकीकरणाविषयी माहितीचे वर्गीकरण**

| अ.क्र. | प्रति.सादाचे स्वरुप | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय | ०० | ००% |
| २. | नाही | ०३ | ६०% |
| ३. | चालू आहे | ०२ | ४०% |
| | एकूण | ०५ | १००% |

**निरीक्षण –**

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, पाच पैकी ०३ (६०%) प्रति.सादक प्राचार्यांनी ग्रंथालय संगणकीकृत केले नाही असे सांगितले तर ०२ (४०%) प्राचार्यांनी प्रक्रिया सुरु आहे असे सांगितले. तर ०० (००%) प्राचार्यांनी होय असे सांगितले.

**अन्वयार्थ –**

यावरुन असा अन्वयार्थ लावला जातो की, पाच कनिष्ठ महाविद्यालयातील ग्रंथालयांपैकी तीन ग्रंथालये ही संगणकीकृत केली नाहीत तर दोन ग्रंथालये ही संगणकीकृत करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

**निष्कर्ष –**

एकही ग्रंथालय संगणकीकृत केलेले नाही.

**ग्रंथालयामध्ये कोणकोणती शैक्षणिक मासिके आहेत ?**

**कोष्टक क्र. ५.११**

**शैक्षणिक मासिकाविषयी माहितीचे वर्गीकरण**

| अ.क्र. | प्रति.सादाचे स्वरुप | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | शिक्षण संक्रमण | ०५ | १००% |
| २. | शिक्षण समिक्षा | ०४ | ८०% |
| ३. | जीवन शिक्षण | ०३ | ६०% |
| ४. | किशोर | ०४ | ८०% |

(टीप: एकापेक्षा अनेक पर्याय एका प्राचार्याने दिल्यामुळे प्रति.सादक संख्या वाढते)

**निरीक्षण –**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, ग्रंथालयासाठी शिक्षण संक्रमण हे मासिक ०५ (१००%) प्राचार्य मागवितात, शिक्षण समिक्षा हे ०४ (८०%) ग्रंथालयामध्ये असून ०३

(६०%) ग्रंथालयामध्ये जीवन शिक्षण हे मासिक मागविले जाते. तर किशोर मासिक हे ०४ (८०%) ग्रंथालयामध्ये मागविले जाते.

**अर्थनिर्वचन –**

यावरुन असे दिसून येते की, पंढरपूर शहरातील सर्व (०५) कनिष्ठ महाविद्यालयामध्ये शिक्षण संक्रमण, ०४ (८०%) कनिष्ठ महाविद्यालयात 'शिक्षण समिक्षा, ०३(५०%) कनिष्ठ महाविद्यालयात जीवन शिक्षण तर किशोर हे मासिक ०४(८०%) कनिष्ठ महाविद्यालयांमधील ग्रंथालयांमध्ये मागिवले जाते.

**निष्कर्ष –**

पंढरपूर शहरातील कनिष्ठ महाविद्यालयांतील जवळ – जवळ सर्वच ग्रंथालयामध्ये वेगवेगळी मासिके मागिवली जातात. पण इंग्रजी मासिके मागविली जात नाहीत. विषयानुसार मासिके मागविली जात नाहीत.

**कनिष्ठ महाविद्यालयामध्ये शिक्षकांना बसण्यासाठी स्वतंत्र कक्ष आहे काय ?**

**कोष्टक क्र. ५.१२**

**शिक्षकांच्या बसण्याच्या कक्षेविषयीच्या माहितीचे विश्लेषण**

| अ.क्र. | प्रति.सादाचे स्वरुप | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय | ०५ | १००% |
| २. | नाही | ०० | ००% |
| | एकूण | ०५ | १००% |

**निरीक्षण –**

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की शिक्षकांना बसण्यासाठी स्वतंत्र कक्ष आहे असे ०५ (१००%) प्राचार्यांनी सांगितले तर नाही असा प्रति.साद ००(००%) प्राचार्यांनी दिला.

**अर्थनिर्वचन –**

यावरुन असे दिसून येते की, पंढरपूर शहरातील जवळ-जवळ सर्वच्या सर्व कनिष्ठ महाविद्यालयामध्ये शिक्षकांना बसण्यासाठी स्वतंत्र कक्ष आहे.

**निष्कर्ष –**

शिक्षकांना बसण्यासाठी स्वतंत्र कक्ष आहे. पण तो पुरेसा प्रशस्त व सोयीसुविधांनी युक्त नाही.

**कनिष्ठ महाविद्यालयामध्ये जीवनशास्त्र, रसायनशास्त्र व भौतिकशास्त्र प्रयोगशाळा स्वतंत्र आहे काय ?**

**कोष्टक क्र. ५.१३**

**कनिष्ठ म.तील स्वतंत्र जीवशास्त्र, र. शास्त्र व भौ. शास्त्र प्रयोग शाळेबद्दल**

| अ.क्र. | प्रति.सादाचे स्वरुप | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | स्वतंत्र आहे | ०३ | ६०% |
| २. | एकत्र आहे | ०२ | ४०% |
| | एकूण | ०५ | १००% |

**निरीक्षण –**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, जीवशास्त्र, रसायनशास्त्र, व भौतिक शास्त्र या शाखांसाठी स्वतंत्र अशी प्रयोगशाळा आहे असे ०३(६०%) प्राचार्यांनी सांगितले तर ०२ (४०%) प्राचार्यांनी स्वतंत्र नसून एकत्रच आहे असे सांगितले.

**अर्थनिर्वचन –**

यावरुन असे दिसून येते की पंढरपूर शहरातील तीन कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये स्वतंत्र अशी प्रत्येक शाखेसाठी प्रयोगशाळा असून दोन कनिष्ठ महाविद्यालयामध्ये विषयवार स्वतंत्र प्रयोगशाळा नसून एकत्रच आहे.

**निष्कर्ष –**

पंढरपूर शहरातील सर्वच कनिष्ठ महाविद्यालयामध्ये स्वतंत्र अशी प्रयोगशाळा नाही.

**कनिष्ठ महाविद्यालयासाठी पुरेसे व स्वत:च्या मालकीचे क्रीडांगण आहे काय ?**

**कोष्टक क्र. ५.१४**

**क्रीडांगणाविषयी माहितीचे विश्लेषण**

| अ.क्र. | प्रति.सादाचे स्वरुप | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय | ०४ | ८०% |
| २. | नाही | ०१ | २०% |
| | एकूण | ०५ | १००% |

**निरीक्षण –**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, कनिष्ठ महाविद्यालयासाठी पुरेसे व स्वत:च्या मालकीचे क्रीडांगण आहे असे ०४(८०%) प्राचार्यांनी सांगितले तर ०१(२०%) प्राचार्यांनी स्वत:च्या मालकीचे व पुरेसे क्रीडांगण नाही असे सांगितले.

**अर्थनिर्वचन –**

यावरुन असे दिसून येते की, पंढरपूर शहरातील चार कनिष्ठ महाविद्यालयांना स्वत:च्या मालकीचे व पुरेसे क्रीडांगण आहे तर एका कनिष्ठ महाविद्यालयास स्वत:च्या मालकीचे क्रीडांगण नाही.

**निष्कर्ष –**

पंढरपूर शहरातील चार कनिष्ठ महाविद्यालयांना पुरेसे क्रीडांगण आहे.

**कनिष्ठ महाविद्यालयामध्ये स्त्री व पुरुषांसाठी स्वतंत्र व पुरेशी स्वच्छतागृहे आहेत काय ?**

**कोष्टक क्र. ५.१५**

**स्वच्छतागृहांविषयीच्या माहितीचे विश्लेषण**

| अ.क्र. | प्रति.सादाचे स्वरुप | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय | ०५ | १००% |
| २. | नाही | ०० | ००% |
| | एकूण | ०५ | १००% |

**निरीक्षण -**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, कनिष्ठ महाविद्यालयामध्ये स्त्री व पुरुषांसाठी स्वतंत्र व पुरेशी स्वच्छतागृहे आहेत असे ०५(१००%) प्राचार्यांनी संगितले तर ००(००%) प्राचार्यांनी नाही असे उत्तर दिले.

**अर्थनिर्वचन -**

यावरुन असे दिसून येते की, पंढरपूर शहरातील पाचही कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये स्त्री व पुरुषांसाठी स्वतंत्र व पुरेशी स्वच्छतागृहे आहेत.

**निष्कर्ष -**

प्रत्येक कनिष्ठ महाविद्यालयामध्ये स्वतंत्र अशी स्वच्छतागृहे आहेत. पण ती पुरेशी व स्वच्छ नाहीत.

## विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी कोणते विशेष प्रयत्न करता ?

**कोष्टक क्र. ५.१६**

**आरोग्यविषयक गोष्टींची माहिती विश्लेषण**

| अ.क्र. | प्रति.सादाचे स्वरुप | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | प्रत्येक महिन्यात वैद्यकी य तपासणी केली जाते | ०२ | १४.२८ |
| २. | वर्षातून एकदा तपासणी केली जाते | ०३ | २१.४२ |
| ३. | आहार विषयक मार्गदर्शन केले जाते | ०५ | ३५.७१ |
| ४. | योगासने करवून घेतली जातात | ०४ | २८.५७ |
| | एकूण | १४ | १००% |

(टीप – काही प्रति.सादकांनी एकापेक्षा जास्त प्रति.साद दिल्यामुळे प्रति.सादक संख्या जास्त येते.

**निरीक्षण –**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, प्रत्येक महिन्यात वैद्यकीय तपासणी केली जाते असे ०२ (४०%) प्राचार्यांनी सांगितले तर वर्षातून एखादा वैद्यकीय तपासणी केली जाते असे ०३ (६०%) प्राचार्यांनी सांगितले. आहाराविषयक मार्गदर्शन केले जाते असे सर्वच म्हणजे ०५(१००%) प्राचार्यांनी सांगितले. तर ०४(८०) प्राचार्यांनी सांगितले की दररोज योगासने ही करवून घेतली जातात.

**अन्वयार्थ –**

यात्ररुन असा अन्वयार्थ लावता येतो की, पंढरपूर शहरातील ०२ कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये प्रत्येक महिन्याला, तसेच तीन कनिष्ठ महाविद्यालयामध्ये वर्षातून एखदा आरोग्यासाठी वैद्यकीय तपासणी केली जाते. तसेच सर्वच महाविद्यालयांमध्ये आहारविषयक योग्य मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले जाते तर चार कनिष्ठ महाविद्यालयामध्ये योगासने करवून घेतली जातात.

**निष्कर्ष –**

पंढरपूर शहरातील सर्वच कनिष्ठ महाविद्यालयांमधून विद्यार्थ्यांच्या आरोग्यविषयी वेगवेगळे कार्यक्रम राबवले जातात. पण वैद्यकीय तपासणीचे प्रमाण कमी आहे.

**कनिष्ठ महाविद्यालयामध्ये स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सोय कशी केली जाते ?**

**कोष्टक क्र. ५.१७**

**पिण्याच्या पाण्याच्या सोयीविषयीच्या माहितीचे विश्लेषण**

| अ.क्र. | पाण्याचे स्त्रोत | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | विहीर, बोअर, हातपंप | ०१ | २०% |
| २. | नगरपालिका नळ | ०३ | ६०% |
| ३. | नगरपालिका व हातपंप | ०१ | २०% |
| | एकूण | ०५ | १००% |

**निरीक्षण –**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की पिण्याच्या पाण्याची सोय विहीर, बोअर व हातपंपाद्वारे केली जाते असे एका (२०%) प्राचार्यांनी सांगितले तर ०३(६०%) प्राचार्यांनी नगरपालिकेचे नळ व बोअर द्वारे केली जाते असे सांगितले तर एका (२०%) प्राचार्यांने सांगितले की नगरपालिका नळ व हातपंपाद्वारे पाणी उपलब्ध केले जाते.

**अन्वयार्थ –**

यावरुन असा अन्वयार्थ लावता येतो की, एका महाविद्यालयामध्ये पिण्याच्या पाण्याची सोय ही विहीर, बोअर व हातपंपाद्वारे तर तीन महाविद्यालयामध्ये नगरपालिका नळ व बोअर द्वारे पाणी उपलब्ध केले जाते तर एका महाविद्यालयामध्ये नगरपालिका नळ व बोअरद्वारे पाणी उपलब्ध केले जाते.

**निष्कर्ष –**

पंढरपूर शहरातील कनिष्ठ महाविद्यालयामध्ये स्वच्छ व पिण्याचे पाणी मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे.

**कनिष्ठ महाविद्यालयामध्ये बोर्ड परीक्षांचे आयोजन केले जाते काय ?**

**कोष्टक क्र. ५.१८**

**बोर्ड परीक्षांच्या आयोजनाविषयी माहितीचे विश्लेषण**

| अ.क्र. | प्रति.सादाचे स्वरुप | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय | ०४ | ८०% |
| २. | नाही | ०१ | २०% |
| | एकूण | ०५ | १००% |

**निरीक्षण –**

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, बोर्ड परीक्षांचे आयोजन केले जाते काय असे विचारले असता ०४ (८०%) प्राचार्यांनी होय असे सांगितले तर एका प्राचार्याने नाही असे सांगितले.

**अन्वयार्थ –**

यावरुन असा अन्वयार्थ लावता येतो की पंढरपूर शहरातील चार कनिष्ठ महाविद्यालयामध्ये बोर्ड परीक्षांचे आयोजन केले जाते तर एका कनिष्ठ महाविद्यालयामध्ये बोर्ड परीक्षांचे आयोजन केले जात नाही.

**निष्कर्ष –**

पंढरपूर शहरातील पाचपैकी चार कनिष्ठ महाविद्यालयामध्ये बोर्ड परीक्षांचे आयोजन केले जाते.

**कनिष्ठ महाविद्यालयामध्ये बोर्ड परीक्षांचे आयोजन केले जात असल्यास कोणते फायदे – तोटे होतात**

**कोष्टक क्र. – ५.१९**

**बोर्ड परीक्षांच्या आयोजनामुळे होणाऱ्या फायदे व तोट्यांविषयी माहितीचे वर्गीकरण**

| अ.क्र. | प्रति.सादाचे स्वरुप<br>फायदे | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | विद्यार्थ्यांच्या सोय होते | ०४ | ८० (३३.३२) |
| २. | प्राध्यापकांना पर्यवेक्षकाचा अनुभव मिळतो. | ०२ | ४० (१६.६६) |
| ३. | विद्यार्थ्यांना दुसरीकडे जावे लागत नाही | ०३ | ६० (२२.९९) |
| ४. | शिक्षक, कर्मचारी यांना अन्य मानधन मिळते | ०१ | २० (१६.६६) |
| ५. | अनुत्तरीत | ०१ | २० (८.३३) |
| | एकूण | | |
| | तोटे | १२ | |
| १. | सुट्टीचा फायदा मिळत नाही | ०२ | ४० (१६.६६) |
| २. | अन्य कार्यात अडथळा येतो | ०३ | ६० (२४.४४) |
| ३. | विद्यार्थ्यांमध्ये शिस्त राहत नाही | ०१ | २० (८.३३) |
| ४. | वातावरण तणावपूर्ण बनते | ०३ | ६० (२४.४९) |
| ५. | पर्यवेक्षकाच्या अडचणी येतात | ०२ | ४० (१६.६६) |
| ६. | अनुत्तरीत | ०१ | २० (८.३३) |
| | एकूण | १२ | |

(टीप – काही प्रति.सादकांनी एकापेक्षा जास्त प्रति.साद दिल्यामुळे प्रति.सादक संख्या जास्त येते.

**निरीक्षण –**

वरील कोष्टकावरुन असे फायदेविषय प्रति.साद देताना ०४(८०%) प्राचार्यांनी विद्यार्थ्यांची सोय होते असे सांगितले. तर ०२(२०%) प्राचार्यांनी प्राध्यापकांना पर्यवेक्षणाचा

अनुभव मिळतो असे सांगितले. ०३(६०%) प्राचार्यांनी सांगितले की विद्यार्थ्यांना दुसरीकडे जावे लागत नाही. तर शिक्षक कर्मचारी यांना मानधन मिळते ०२ असे प्राचार्यांनी सांगितले तर एका प्राचार्याने प्रति.साद दिला नाही. तसेच तोटे विषयक प्रति.साद देताना अनुक्रमे प्रत्येकी ०२(४०%) प्राचार्यांनी सांगितले की, सुट्टीचा फायदा मिळत नाही व पर्यवेक्षकाच्या अडचणी येतात असे सांगितले. तर अनुक्रमे प्रत्येकी ०३(६०%) प्राचार्यांनी अन्य कार्यात अडचण येते व वातावरण तणावपूर्वक बनते असे सांगितले. विद्यार्थ्यांमध्ये शिस्त राहत नाही असे एका (२०%) प्राचार्याने सांगितले तर एका प्राचार्याने प्रति.साद दिला नाही.

**अन्वयार्थ –**

यावरुन असा अन्वयार्थ लावता येतो की, बोर्ड परीक्षांचे आयोजन केल्यामुळे विद्यार्थ्यांना दुसरीकडे जावे लागत नाही व विद्यार्थ्यांचीही सोय होते. प्राध्यापकांना निरीक्षणाचा अनुभव मिळतो व शिक्षक कर्मचारी यांना मानधन मिळते. इ. फायदे होतात तर सुट्टीचा लाभ मिळत नाही नियंत्रण होत नाही, विद्यार्थ्यांतील शिस्त बिघडते, तणाव निर्माण होतो व अन्य कामात अडथळे येतात. इत्यादी तोटे होतात तर एका प्राचार्याने प्रति.साद दिला नाही.

**निष्कर्ष –**

बोर्ड परीक्षांचे आयोजन केल्याने फायदे कमी व तोटे जादा होतात व ते पुढीलप्रमाणे आहेत.

**फायदे** – १) विद्यार्थ्यांची सोय होते २) प्राध्यापकांना पर्यवेक्षणाचा अनुभव मिळतो ३) विद्यार्थ्यांना ११ वी साठी दुसरीकडे जावे लागत नाही ४) शिक्षक व कर्मचाऱ्यांना जादा मानधन मिळते.

**तोटे** – १) सुट्टीचा फायदा मिळत नाही २) महाविद्यालयाच्या अन्य कामात अडथळा निर्माण होतो ३) वातावरण तणावपूर्ण बनते ४) विद्यार्थ्यांमध्ये शिस्त राहत नाही ५) पर्यवेक्षणाच्या अडचणी येतात.

**कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांच्या जबाबदाऱ्या केव्हा निश्चित केल्या जातात.**

**कोष्टक क्र. – ५.२०**

**शिक्षकांच्या जबाबदाऱ्या निश्चिती विषयक कालावधीचे वर्गीकरण**

| अ.क्र. | कालावधी | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | वर्षाच्या सुरुवातीस | ०२ | ६० |
| २. | प्रथम सत्र व व्दितीय सत्र | ०१ | २० |
| ३. | कामाच्या वेळी कधीही | ०१ | २० |
| ४. | गरज पडेल तेव्हा | ०१ | २० |
| | एकूण | ०५ | १०० |

**निरीक्षण –**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, शिक्षकांच्या जबाबदाऱ्या निश्चित या वर्षाच्या सुरुवातीस जातात असे ०२(४०%) प्राचार्यांनी सांगितले तर प्रथम सत्र व द्वितीय सत्र, कामाच्या वेळी कधीही व गरज पडेल तेव्हा केल्या जातात असे अनुक्रमे एका (२०%) प्राचार्यांनी सांगितले.

**अन्वयार्थ –**

यावरुन असा अन्वयार्थ लावला जातो की वर्षाच्या सुरुवातीस शिक्षकांच्या जबाबदाऱ्या निश्चित दोन कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य करतात तर प्रत्येकी एका महाविद्यालयाचे प्राचार्य हे अनुक्रमे प्रथम सत्र व द्वितीय सत्र, कामाच्यावेळी कधीही व गरज पडेल तेव्हा शिक्षकांच्या जबाबदाऱ्या निश्चित करतात.

**निष्कर्ष –**

प्रत्येक शिक्षकाच्या कामाच्या जबाबदाऱ्या या निश्चित केल्या जातात.

विद्यार्थी संख्या  क्षमतेपेक्षा जास्त असल्यास कोणते दोष निर्माण होतात ?

**कोष्टक क्र. – ५.२१**

**जास्त विद्यार्थी संख्येमुळे निर्माण होणाऱ्या दोषांचे वर्गीकरण**

| अ.क्र. | दोष | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | बसण्यास अडचण होते | ०२ | ४० |
| २. | वर्ग नियंत्रण करणे कठीण होते | ०१ | २० |
| ३. | वैयक्तिक लक्ष देता येत नाही | ०१ | २० |
| ४. | शिस्त बिघडते | ०४ | ८० |
| ५. | सोयी अपुऱ्या पडतात | ०२ | ४० |
| ६. | प्रत्येकाच्या गरजा पूर्ण होत नाहीत | ०४ | ६० |
| ७. | अनुत्तरीत | ०१ | २० |
| | एकूण | १५ | |

(टीप – काही प्रति.सादकांनी एकापेक्षा जास्त प्रति.साद दिल्यामुळे प्रति.सादक संख्या जास्त येते.

**निरीक्षण –**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, जास्त विद्यार्थीसंख्येमुळे दोष निर्माण होतात असे विचारले असता, बसण्यास अडचण होते व सोयी अपुऱ्या पडतात असे अनुक्रमे ०२(४०%) प्राचार्यांनी सांगितले, तसेच वर्ग नियंत्रण करणे कठीण जाते व वैयक्तिक लक्ष देता येत नाही असे अनुक्रमे दोन (४०%) प्राचार्यांनी सांगितले तर प्रत्येकी शिस्त बिघडते व प्रत्येकाच्या गरजा पूर्ण होत नाहीत असे अनुक्रमे ०४(८०%) प्राचार्यांनी सांगितले तर एका (२०%) प्राचार्यांनी प्रति.साद दिला नाही.

**अन्वयार्थ –**

यावरुन असा अन्वयार्थ लावता येतो की, विद्यार्थी संख्या क्षमतेपेक्षा जास्त असल्यामुळे शिस्त बिघडते व प्रत्येकाच्या गरजा पूर्ण होत नाहीत हे सर्वमान्य आहे तर सोयी अपुऱ्या पडतात, बसण्यास अडचण होते तसेच वर्ग नियंत्रण करणे व वैयक्तिक लक्ष देता येत नाही हे दोष निर्माण होतात तर एका प्राचार्याने मत व्यक्त केले नाही.

**निष्कर्ष –**

जास्त विद्यार्थी संख्येमुळे अनेक दोष निर्माण होतात ते पुढीलप्रमाणे – १) बसण्यास अडचण होते २) नियंत्रण होत नाही ३) वैयक्तिक लक्ष देता येत नाही. ४) सोयी अपुऱ्या पडतात. ५) गरजा पूर्ण होत नाहीत.

**सेवातर्गत प्रशिक्षण घेवून आलेल्या प्राध्यापकांच्या अध्यापणात कोणता फरक जाणवतो.**

**कोष्टक क्र. ५.२२**

**प्रशिक्षित प्राध्यापकांच्या अध्यापनातील फरकाविषयीचे वर्गीकरण**

| अ.क्र. | अध्यापनातील फरक | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | शैक्षणिक साधनांचा अध्यापनात वापर करतात | ०३ | ६० |
| २. | उदाहरणांची जोड व्यावहारिक अनुभवाशी घालतात | ०१ | २० |
| ३. | विषयांतर होत नाही | ०१ | २० |
| | एकूण | ०५ | १०० |

**निरीक्षण :**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, सेवांतर्गत प्रशिक्षण घेवून आलेल्या प्राध्यापकांच्या अध्यापनात कोणता फरक जाणवतो असे विचारले असता ०३(६०%) प्राचार्यांनी सांगितले की अध्यापनात शैक्षणिक साधनांचा वापर करतात. तर प्रत्येकी एका (२०%) प्राचार्यांनी अनुक्रमे सांगितले की उदाहरणांची जोड व्यावहारिक अनुभवांशी घालतात व विषयांतर होत नाही.

**अन्वयार्थ -**

यावरुन असा अन्वयार्थ लावता येतो की, सेवांतर्गत प्रशिक्षण घेवून आलेल्या प्राध्यापकांच्या अध्यापनात फरक जाणवतो. प्राध्यापक अध्यापनात शैक्षणिक साधनांचा वापर करतात. तसेच उदाहरणांची जोड व्यावहारिक अनुभव देतात व विषयांतर होत नाही.

**निष्कर्ष -**

सेवांतर्गत प्रशिक्षण घेवून आलेल्या प्राध्यापकांच्या अध्यापनात फरक जाणवतो व तो सकारात्मक असतो.

**सेवांतर्गत प्रशिक्षणासाठी आपण प्राध्यापकांना पाठवता काय ?**

**कोष्टक क्र. ५.२३**

**सेवांतर्गत प्रशिक्षणासाठी प्राध्यापकांना पाठविण्याबाबतच्या माहितीचे वर्गीकरण**

| अ.क्र. | प्रति.सादाचे स्वरुप | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय | ०५ | १००% |
| २. | नाही | ०० | ००% |
| | एकूण | ०५ | १००% |

**निरीक्षण -**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, ०५(१००%) प्रति.सादक प्राचार्यांनी सांगितले की, सेवांतर्गत प्रशिक्षणासाठी प्राध्यापकांना पाठविले जाते. तर ००(००%) प्राचार्यांनी प्रशिक्षणासाठी पाठवले जात नाही असे सांगितले.

**अन्वयार्थ -**

यावरुन असे दिसून येते की, एकूण पाचही कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांना सेवांतर्गत प्रशिक्षणासाठी पाठवले जाते.

**निष्कर्ष -**

प्राध्यापकांना सेवांतर्गत प्रशिक्षणासाठी पाठविले जाते.

**प्राध्यापकांच्या नियुक्तीच्यावेळी कोणत्या आडचणी येतात ?**

**कोष्टक क्र. - ५.२४**

**प्राध्यापकांच्या नियुक्तीच्यावेळी येणाऱ्या अडचणीविषयक माहितीचे वर्गीकरण**

| अ.क्र. | प्रति.सादाचे स्वरुप | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | अर्धवेळ तासिका तत्त्वावर नेमणूकीमुळे उमेदवार उपलब्ध होत नाही | ०१ | २० |
| २. | अनुसुचित जमातीचे उमेदवार मिळत नाहीत | ०३ | ६० |
| ३. | अडचणी येत नाहीत | ०१ | २० |
| | एकूण | ०५ | १००% |

**निरीक्षण -**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, प्राध्यापकांच्या नियुक्तीच्यावेळी कोणत्या आडचणी येतात असे विचारले असता पाच प्राचार्यांपैकी ०३ (६०%) प्राचार्यांनी सांगितले की अनुसूचित जमातीचे उमेदवार मिळत नाहीत. तसेच एका (२०%) प्राचार्याने सांगितले की, अर्धवेळ तासिका तत्वावर नेमणूकीमुळे उमेदवार उपलब्ध होत नाहीत. तर एका (२०%) प्राचार्याने अडचणी येत नाहीत असे सांगितले.

**अन्वयार्थ -**

यावरुन असा अन्वयार्थ लावता येतो की, प्राध्यापकाच्या नियुक्तीच्यावेळी अनुसुचित जमातीचे उमेदवार मिळत नाहीत, अर्धवेळ तासिका तत्वावर नेमणूकीमुळे उमेदवार येत नाहीत तर एका प्राचार्याने अडचणी येत नाहीत असे सांगितले.

**निष्कर्ष –**

प्राध्यापकांच्या नियुक्तीच्यावेळी अडचणी येतात त्या पुढीलप्रमाणे – १) तासिका तत्वावर उमेदवार मिळत नाही. २) अनुसूचीत जाती व जमातीचे उमेदवार मिळत नाहीत.

**शिक्षकांच्या अध्यापनाचे निरीक्षण कोणत्या पद्धतीने करता ?**

**कोष्टक क्र. – ५.२५**

**शिक्षकांच्या अध्यापनाच्या निरीक्षण पद्धतीचे वर्गीकरण**

| अ.क्र. | प्रति.सादाचे स्वरुप | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | पदनिश्चयन श्रेणी | ०२ | ४० |
| २. | निरीक्षण मुद्दे तयार करुन | ०२ | ४० |
| ३. | रेकॉर्ड करुन | ०१ | २० |
| | एकूण | ०५ | १००% |

**निरीक्षण –**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की शिक्षकांच्या अध्यापनाचे निरीक्षण कोणत्या पद्धतीनेकरता असे विचारले असता पाच पैकी प्रत्येकी ०२ (४०%) प्राचार्यांनी अनुक्रमे पदनिश्चयन श्रेणी व निरीक्षण मुद्दे तयार करुन निरीक्षण केले जाते असे सांगितले तर एका (२०%) प्राचार्यांने रेकॉर्ड करतो असे सांगितले.

**अन्वयार्थ –**

यावरून असा अन्वयार्थ लावता येतो की, शिक्षकांच्या अध्यापनाचे निरीक्षण हे पदनिश्चयन श्रेणी, निरीक्षण मुद्यांच्या आधारे व रेकॉर्डींगच्या आधारे केले जाते. असे अनुक्रमे प्रत्येकी दोन, व एका प्राचार्यांने सांगितले.

**निष्कर्ष –**

शिक्षकांच्या अध्यापनाचे निरीक्षण पदनिश्चयन श्रेणी, निरीक्षणसूची द्वारे केले जाते. पण नियमितपणे अध्यापनाचे निरीक्षण करणे प्राचार्यांना शक्य होत नाही.

**कनिष्ठ महाविद्यालयात अनुदानित आहे काय ?**

**कोष्टक क्र. – ५.२६**

**कनिष्ठ महाविद्यालयाच्या अनुदानाविषयी माहितीचे वर्गीकरण**

| अ.क्र. | प्रति.सादाचे स्वरुप | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय | ०५ | १००% |
| २. | नाही | ०० | ००% |
| | एकूण | ०५ | १००% |

**निरीक्षण –**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, ०५ (१००%) प्राचार्यांनी सांगितले की अनुदानित आहे तर ००(००%) प्राचार्यांनी अनुदानित नाही असे सांगितले.

**अन्वयार्थ –**

यावरुन असा अन्वयार्थ लावला जातो की पंढरपूर शहरातील पाच कनिष्ठ महाविद्यालये ही अनुदानित आहेत व विना अनुदानित एकही नाही.

**निष्कर्ष –**

सर्वच्या सर्व कनिष्ठ महाविद्यालये अनुदानित आहेत.

**प्राध्यापक आपल्या दैनंदिन अध्यापन कार्याचे नियोजन करतात काय ?**

**कोष्टक क्र. – ५.२७**

**प्राध्यापकांच्या अध्यापन कार्याच्या नियोजनाविषयीच्या माहितीचे वर्गीकरण**

| अ.क्र. | प्रति.सादाचे स्वरुप | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय | ०४ | ८०% |
| २. | नाही | ०१ | २०% |
| | एकूण | ०५ | १००% |

**निरीक्षण –**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, ०४(८०%) प्राचार्यांनी सांगितले की, प्राध्यापक आपल्या दैनंदिन अध्यापन कार्याचे नियोजन करतात तर एका (२०%) प्राचार्यांनि करत नाहीत असे सांगितले.

**अन्वयार्थ –**

यावरुन असा अन्वयार्थ लावला जातो की चार कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आपल्या दैनंदिन अध्यापन कार्याचे नियोजन करतात तर एका कनिष्ठ महाविद्यालयामध्ये प्राध्यापक दैनंदिन अध्यापनाचे नियोजन करत नाहीत.

**निष्कर्ष –**

पाचपैकी चार  कनिष्ठ महाविद्यालयोच प्राध्यापक अध्यापनाचे नियोजन करतात तर एका महाविद्यालयाचे प्राध्यापक नियोजन करत नाहीत.

**आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या बदल्या केल्या जातात काय ?**

**कोष्टक क्र. ५.२८**

**प्राध्यापकांच्या बदल्याविषयी माहितीचे वर्गीकरण**

| अ.क्र. | प्रति.सादाचे स्वरुप | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय | ०४ | ८०% |
| २. | नाही | ०१ | २०% |
| | एकूण | ०५ | १००% |

निरीक्षण – वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, पाचपैकी चार (८०%) प्राचार्यांनी सांगितले प्राध्यापकांच्या बदल्या केल्या जात नाहीत तर एका प्राचार्याने (२०%) सांगितले की बदल्या केल्या जातात.

**अन्वयार्थ –**

यावरुन असा अन्वयार्थ लावला जातो की, चार कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या बदल्या केल्या जात नाहीत. पण एका कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या बदल्या केल्या जातात.

**निष्कर्ष –**

पाचपैकी एका कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या इतर शाखांमध्ये बदल्या होतात.

**प्राध्यापकांच्या अध्यापनाचे निरीक्षण करत असल्यास निरीक्षणासाठी वेळेचे नियोजन कसे करता?**

**कोष्टक क्र. ५.२९**

**अध्यापनाच्या निरीक्षणविषयक माहितीचे वर्गीकरण**

| अ.क्र. | प्रति.सादाचे स्वरुप | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | दर आठवड्यातून एकदा | ०१ | २० |
| २. | दर महिन्यातून एकदा | ०२ | ४० |
| ३. | तीन महिन्यातून एकदा | ०१ | २० |
| ४. | वेळ मिळत नाही | ०१ | २० |
| | एकूण | ०५ | १००% |

**निरीक्षण –**

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, ०८(२०%) प्राचार्य आठवड्यातून एखदा निरीक्षण करतात. तर दोन (४०%) प्राचार्य दर महिन्यातून एकदा निरीक्षण करतात. एक (२०%) प्राचार्य तीन महिन्यातून एखदा तर एक (२०%) प्राचार्य वेळ मिळेल तेव्हा प्राध्यापकांच्या अध्यापनाचे निरीक्षण करतात.

**अन्वयार्थ –**

यावरुन असे दिसून येते की तीन प्राचार्य (६०%) अध्यापकांच्या अध्यापन कार्याचे नियमीत निरीक्षण करतात. एक प्राचार्य तीन महिन्यातून केव्हाही एखदा निरीक्षण करतात तर एक प्राचार्य वेळ मिळेल तेव्हा निरीक्षण करतात.

**निष्कर्ष –**

वेळ मिळेल तेव्हाच प्राचार्य अध्यापनाचे निरीक्षण करतात.

**प्राध्यापकांच्या अध्यापनातील चुका दूर करण्यासाठी कोणत्या उपाययोजना करता ?**

**कोष्टक क्र. ५.३०**

**अध्यापनातील चुका दूर करण्यासाठीच्या उपाययोजनांचे वर्गीकरण**

| अ.क्र. | उपाययोजनांचे स्वरुप | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | वेळीच सूचना देणे | ०२ | ४० |
| २. | वैयक्तिक मार्गदर्शन करणे | ०१ | २० |
| ३. | दुसऱ्या शिक्षकांचे पाठ पहायला लावणे | ०१ | २० |
| ४. | सेवांतर्गत प्रशिक्षणाला पाठवणे | ०१ | २० |
| | एकूण | ०५ | १००% |

**निरीक्षण –**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की पाच पैकी दोन (४०%) प्राचार्य शिक्षकांना अध्यापनातील चुका दूर करण्यासाठी वेळीच सूचना देतात. एक (२०%) प्राचार्य वैयक्तिक मार्गदर्शन करतात तर प्रत्येकी एक (२०%) प्राचार्य अनुक्रमे दुसऱ्या शिक्षकांचे पाठ पहायला लावतात व सेवांतर्गत प्रशिक्षणाला पाठवतात. अशा उपाययोजना करतात असे दिसून येते.

**अन्वयार्थ –**

यावरुन असे दिसून येते की, आध्यापकाच्या अध्यापनातील चुका दूर करण्यासाठी प्राचार्य वेळीच सूचना देतात. तर प्रत्येकी एक प्राचार्य अनुक्रमे वैयक्तिक मार्गदर्शन करतात, दुसऱ्याचे पाठ निरीक्षण करायला लावतात व सेवांतर्गत प्रशिक्षणाला पाठवतात.

**निष्कर्ष –**

शिक्षकांच्या अध्यापनातील चुका दूर करण्यासाठी प्राचार्य वेळीच उपाययोजना करतात. त्यासाठी ते त्यांनी सूचना देतात.

**विद्यार्थ्यांची हजेरी असमाधानकारक असल्यास कोणत्या उपाययोजना करतात ?**

**कोष्टक क्र. ५.३१**

**उपस्थिती वाढविण्यासाठीच्या उपाययोजनांचे वर्गीकरण**

| अ.क्र. | उपाययोजनेचे स्वरुप | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | दर दिवसाला दंड आकारणे | ०२ | ४० |
| २. | पालकांना बोलावून घेणे | ०२ | ४० |
| ३. | प्रत्येक महिन्याला १००% हजेरी असणाऱ्यास बक्षिस देणे | ०१ | २० |
| | एकूण | ०५ | १००% |

**निरीक्षण –**

वरील कोष्टकावरुन दिसून येते की, पाचपैकी प्रत्येकी दोन (४०%) प्राचार्य अनुक्रमे दर दिवसाला दंड आकारणे व पालकांना बोलावून घेणे या उपाययोजना विद्यार्थी उपस्थितीत वाढवण्यासाठी करतात तर एक (२०%) प्राचार्य प्रत्येक महिन्याला १००% हजेरी असणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षिस देवून उपस्थिती वाढवण्यासाठी प्रयत्न करतात.

**अन्वयार्थ –**

यावरुन असा अन्वयार्थ लावता येतो की, विद्यार्थी उपस्थिती वाढवण्यासाठी प्राचार्य विद्यार्थ्यांना दंड दर दिवसाला आकारतात तसेच त्यांच्या पालकांना बोलावून घेतात व ज्या विद्यार्थ्यांची दर महिन्याला १००% हजेरी असेल त्याला बक्षिस देवून उपस्थिती वाढविण्यासाठी प्रयत्न करतात.

**निष्कर्ष –**

विद्यार्थी उपस्थितीती वाढवण्यासाठी दंड करणे, पालकांना बोलावणे व बक्षिस देणे यासारख्या उपाययोजना केल्या जातात.

**शिक्षक व सेवक संख्या पुरेशी नसल्यास त्याचा प्रशासनावर कोणता परिणाम होतो ?**

**कोष्टक क्र. ५.३२**

**कर्मचारी कमतरतेमुळे प्रशासणावर होणाऱ्या परिणामांचे वर्गीकरण**

| अ.क्र. | परिणामाचे स्वरुप | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | प्राचार्यावर कामाचा ताण पडतो | ०२ | ४० |
| २. | नियोजनानुसार प्रशासन चालविता येत नाही | ०१ | २० |
| ३. | स्वच्छता, सौदर्य राखता येत नाही | ०१ | २० |
| ४. | ठराविक लोकांवरच विसंबून रहावे लागते | ०१ | २० |
| | एकूण | ०५ | १००% |

**निरीक्षण –**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, कर्मचारी कमतरतेमुळे पाचपैकी ०२(४०%) प्राचार्यांनी सांगितले की प्राचार्यावर कामाचा ताण पडतो. प्रत्येकी एका (२०%) प्राचार्यांनी अनुक्रमे नियोजनानुसार प्रशासन चालविता येत नाही, स्वच्छता, सौंदर्य राखता येत नाही व ठराविक लोकांवरच अवलंबून राहावे लागते असे सांगितले.

**अन्वयार्थ –**

यावरुन असा अन्वयार्थ लावता येतो की, कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे प्राचार्यावर कामाचा ताण पडतो, नियोजनानुसार प्रशासन चालवता येत नाही, स्वच्छता राखता येत नाही व ठराविक लोकांवरच प्रशासनाला विसंबून रहावे लागते.

**निष्कर्ष –**

कर्मचारी कमतरतेमुळे उपलब्ध लोकांवर कामाचा ताण पडतो व वेळेत कार्य पूर्ण करता येत नाही.

**वेळापत्रकाप्रमाणे कामकाज चालविताना अडचणी येतात का ?**

**कोष्टक क्र. – ५.३३**

**वेळापत्रकाप्रमाणे कामकाज चालविताना येणाऱ्या अडचणींच्या माहितीचे विश्लेषण**

| अ.क्र. | प्रति.सादाचे स्वरुप | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय | ०१ | २०% |
| २. | नाही | ०४ | ८०% |
| | एकूण | ०५ | १००% |

**निरीक्षण –**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, वेळापत्रकाप्रमाणे कामकाज चालविताना अडचणी येतात असे एका (२०%) प्राचार्यांने प्रति.साद दिला तर ०४(८०%) प्राचार्यांनी अडचणी येत नाहीत असा प्रति.साद दिला.

**अन्वयार्थ –**

यावरुन असा अन्वयार्थ लावता येतो की, वेळापत्रकाप्रमाणे कामकाज चालविताना अडचणी येत नाहीत असे पाचपैकी चार प्राचार्यांचे मत आहे तर एका प्राचार्यांच्या मते अडचणी येतात.

**निष्कर्ष –**

वेळापत्रकाप्रमाणे कामकाज चालविताना अडचणी येत नाहीत.

**आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील कला, वाणिज्य व विज्ञान शाखांचा यावर्षी निकाल किती टक्के लागला.**

**कोष्टक क्र. – ५.३४**

**शैक्षणिक वर्ष सन २००७–२००८ या वर्षातील इयत्ता ११ वी व इ. १२ वी चा निकाल दर्शविणारा तक्ता –**

| अ.क्र. | कनिष्ठ महाविद्यालयाचे नांव | इयत्ता | शाखा | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | कला | वाणिज्य | शास्त्र | |
| १. | कर्मवीर भाऊराव पाटील कनिष्ठ महाविद्यालय | ११ वी<br>१२ वी | ९४%<br>८९% | ९२%<br>८७% | ९५%<br>९१% | ९३%<br>८९% |
| २. | उमा कनिष्ठ महाविद्यालय | ११ वी<br>१२ वी | ७६%<br>७४% | ८२%<br>७८% | ८६%<br>८१% | ८१.३३%<br>७७.६६% |
| ३. | विवेक वर्धिनी कनिष्ठ महाविद्यालय | ११ वी<br>१२ वी | ८६%<br>८४% | ८८%<br>८१% | ८७%<br>८६% | ८७%<br>८३.६६% |
| ४. | वामनराव माने कनिष्ठ महाविद्यालय | ११ वी<br>१२ वी | ९०%<br>८३% | ९२%<br>८७% | ९४%<br>८५% | ९२%<br>८५% |
| ५. | विठ्ठल कनिष्ठ महाविद्यालय | ११ वी<br>१२ वी | ९१%<br>८६% | --<br>-- | ८८%<br>८३% | ८९.५०%<br>८४.५०% |

**निरीक्षण –**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की कर्मवीर भाऊराव पाटील कनिष्ठ महाविद्यालयाचा ११ वी चा निकाल ९३.६६ % तर बारावीचा ८९% लागला. उमा कनिष्ठ महाविद्यालयाचा ११ वी चा ८१.३३ तर १२ वी चा ७७.६६ % निकाल लागला. विवेक वर्धिनी कनिष्ठ महाविद्यालयाचा ११ वी चा ८७% तर १२ वी चा ८३.६६% निकाल लागला. वामनराव माने कनिष्ठ महाविद्यालयाचा ११ वी चा ९२% तर १२ वी चा ८५% निकाला लागला. तर विठ्ठल कनिष्ठ महाविद्यालयाचा ११ वी चा ८९.५०% तर १२ वी चा ८४.५०% निकाल लागला आहे.

**अन्वयार्थ -**

यावरुन असा अन्वयार्थ लावता येतो की, सन २०००७-०८ मध्ये पंढरपूर शहरातील पाच कनिष्ठ महाविद्यालयामध्ये सर्वात जास्त . ११ वी व १२ वी चा निकाल कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाचा अनुक्रमे ९३.६६% व ८९% लागला तर सर्वात कमी निकाल उमा महाविद्यालयाचा इ. ११ वी व १२ वीचा अनुक्रमे ८१.३३ % व ७७.६६ % लागला.

**निष्कर्ष -**

सन २००७-०८ मधील ११ वी व १२ वी चे जवळ - जवळ ८५% पेक्षा जास्त निकाल लागले आहेत.

**यावर्षीचे निकाल समाधानकारक वाटतात काय ?**

**कोष्टक क्र. - ५.३५**

**यावर्षीच्या निकालाच्या समाधानकारकतेबद्दल माहितीचे विश्लेषण**

| अ.क्र. | प्रति.सादाचे स्वरुप | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय | ०३ | ६०% |
| २. | नाही | ०२ | ४०% |
| | एकूण | ०५ | १००% |

**निरीक्षण -**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, पाच पैकी ०३ (६०%) प्राचार्यांनी यावर्षीचे निकाल समाधानकारक वाटतात असे सांगितले तर ०२(४०%) प्राचार्यांनी यावर्षीचे निकाल समाधानकारक वाटत नाहीत असे सांगितले.

**अन्वयार्थ -**

यावरुन असा अन्वयार्थ लावता येतो की पाच प्रति.सादक प्राचार्यपैकी तीन प्राचार्यांच्या मते यावर्षीचे परीक्षांचे निकाल हे समाधानकारक वाटतात तर दोघांच्या मते हे निकाल समाधानकारक वाटत नाहीत.

**निष्कर्ष –**

यावर्षीचे निकाल समाधानकारक आहेत.

**वेगवेगळ्या स्पर्धांसाठी विद्यार्थी बाहेर पाठविता काय ?**

**कोष्टक क्र ५.३६**

**विद्यार्थ्यांना स्पर्धासाठी बाहेर पाठविण्याबाबत माहितीचे वर्गीकरण**

| अ.क्र. | प्रति.सादाचे स्वरुप | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय | ०४ | ८०% |
| २. | नाही | ०१ | २०% |
| | एकूण | ०५ | १००% |

**निरीक्षण –**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की पाच पैकी ०४(८०%) प्रति.सादक प्राचार्यांनी विद्यार्थी स्पर्धेसाठी बाहेर पाठवतो असे सांगितले तर एका (२०%) प्राचार्याने पाठवित नाही असा प्रति.साद दिला.

**अन्वयार्थ –**

यावरुन असा अन्वयार्थ लावला जातो की, पाच कनिष्ठ महाविद्यालयापैकी चार महाविद्यालयाचे प्राचार्य हे विद्यार्थ्यांना स्पर्धेसाठी बाहेर पाठवता तर एक प्राचार्य हे विद्यार्थ्यांना स्पर्धेसाठी बाहेर पाठवत नाहीत.

**निष्कर्ष –**

पंढरपूर शहरातील एका महाविद्यालयातील मुलांना स्पर्धेसाठी बाहेर पाठवले जात नाही.

**इयत्ता १२ वी च्या हुशार विद्यार्थ्यांना विशेक्ष कोचिंग केले जाते काय ?**

**कोष्टक क्र. – ५.३७**

**विद्यार्थ्यांच्या विशेष कोचिंग विषयी माहितीचे वर्गीकरण**

| अ.क्र. | प्रति.सादाचे स्वरुप | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय | ०५ | १००% |
| २. | नाही | ०० | ००% |
| | एकूण | ०५ | १००% |

**निरीक्षण –**

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की एकूण पाच प्रति.सादक प्राचार्यांपैकी पाचही (१००%) प्राचार्यांनी सांगितले की १२ वी च्या हुशार विद्यार्थ्यांना विशेष कोचिंग केले जाते तर ०० (००%) प्राचार्यांनी नाही असे सांगितले.

**अन्वयार्थ –**

यावरुन असा अन्वयार्थ लावला जातो की, सर्वच्या सर्व कनिष्ठ महाविद्यालयांमधील इयत्ता १२ वी च्या हुशार विद्यार्थ्यांना विशेष कोचिंग केले जाते.

**निष्कर्ष –**

इयत्ता १२ वी च्या हुशार विद्यार्थ्यांना विशेष कोचिंग केले जाते.

**आपले कनिष्ठ महाविद्यालय माध्यमिक शाळेशी संलग्न आहे का वरिष्ठ महाविद्यालयाशी संलग्न आहे ?**

**कोष्टक क्र. ५.३८**

**कनिष्ठ महाविद्यालयाच्या संलग्नतेविषयी माहितीचे वर्गीकरण**

| अ.क्र. | प्रति.सादाचे स्वरुप | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | माध्यमिक शाळेशी संलग्न | ०३ | ६०% |
| २. | वरिष्ठ महाविद्यालयाशी संलग्न | ०२ | ४०% |
| | एकूण | ०५ | १००% |

**निरीक्षण –**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की एकूण पाच कनिष्ठ महाविद्यालयापैकी ०३ (६०%) कनिष्ठ महाविद्यालये ही माध्यमिक शाळेशी संलग्न आहेत तर ०२(४०%) कनिष्ठ महाविद्यालये ही वरिष्ठ महाविद्यालयाला संलग्न आहे.

**अन्वयार्थ –**

यावरुन असा अन्वयार्थ लावला जातो की, पाच कनिष्ठ महाविद्यालयापैकी तीन कनिष्ठ महाविद्यालये माध्यमिक शाळेला संलग्न आहेत तर दोन कनिष्ठ महाविद्यालये ही वरिष्ठ महाविद्यालयास संलग्न आहेत.

**निष्कर्ष –**

पाचपैकी तीन माध्यमिक शाळेला संलग्न तर दोन वरिष्ठ महाविद्यालयास संलग्न कनिष्ठ महाविद्यालये आहेत.

## प्राचार्यांकडून मुलाखतीद्वारा मिळालेल्या माहितीचे विश्लेषण

## (कोष्टकरुपाने दाखवता न येणाऱ्या मुक्त प्रति.सादाचे विश्लेषण पुढे आहे)

**प्रश्न – अध्यापन कार्याचे नियोजन न करणाऱ्या प्राध्यापकांसाठी तुम्ही कोणत्या उपाययोजना करता ?**

**विश्लेषण –**

अध्यापन कार्याचे नियोजन न करणाऱ्या प्राध्यापकांसाठी तुम्ही कोणत्या उपाययोजना करता असे विचारले असता पाच पैकी चार (८०%) प्राचार्यांनी सांगितले की आमच्या कॉलेजमधील प्राध्यापक अध्यापन कार्याचे नियोजन करतात. उर्वरित एका (२०%) प्राचार्यांने सांगितले की प्राध्यापकांना वेळोवेळी सूचना दिल्या जातात, नियोजन करून दाखविण्यास सांगितले जाते, नियोजन करावे म्हणून प्रेरणा दिली जाते.

**अन्वयार्थ –**

यावरुन असे लक्षात येते की, पाच पैकी चार कॉलेजमधील प्राध्यापक पाठ नियोजन करतात त्यामुळे उपाययोजना करण्याची गरज नाही. एका कॉलेज मधील प्राध्यापकांनी पाठ नियोजन करावे म्हणून त्यांना प्राचार्यांकडून सूचना दिल्या जातात व नियोजन करावे म्हणून प्रेरणा दिली जाते.

**निष्कर्ष –**

अध्यापन कार्याचे नियोजन प्राध्यापकांना अनिवार्य केले आहे तरीही काही प्राध्यापकांना वारंवार सूचना द्याव्या लागतात.

**प्रश्न – स्वत:च्या मालकीचे क्रीडांगण असल्याचे त्याचे क्षेत्रफळ किती आहे ?**

**विश्लेषण –**

स्वत:च्या मालकीचे क्रिडांगण असल्यास तिचे क्षेत्रफळ किती आहे असे विचारले असता पाच पैकी चार (८०%) प्राचार्यांनी प्रत्येकी एकाने अनुक्रमे १२० बाय ८० मीटर, ८० बाय ६० मीटर ६० बाय ४० मीटर व ७० बाय ५० मीटर क्षेत्रफळ आहे असे सांगितले. तर एका (२०%) प्राचार्याने स्वत:च्या मालकीचे क्रीडांगण नाही असे सांगितले.

**अन्वयार्थ –**

यावरुन असा अन्वयार्थ लावता येतो की जास्तीत जास्त मोठे क्रिडांगण १२० बाय ८० मीटरचे तर सर्वात लहान क्रीडांगण ६० बाय ४० मीटर लांबी – रुंदीचे आहे व एका कॉलेजसाठी क्रिडांगण स्वत:च्या मालकीचे नाही.

**निष्कर्ष –**

पाचपैकी चार कनिष्ठ महाविद्यालयांना पुरेसे क्रीडांगण आहे.

**प्रश्न – कार्यालयीन कामाची विभागणी कशी केली जाते ?**

**विश्लेषण –**

कार्यालयीन कामाची विभागणी कशी केली जाते असे विचारले असता मिळालेली माहिती अशी की तीन माणसांची समिती स्थापन करून त्यांच्यामार्फत कामाची वाटणी केली जाते. तसेच अति महत्वाची जबाबदारीची कामे प्राचार्यांकडे, त्यानंतर महत्वाची व शासनाशी संबंधीत कामे लिपिकाकडे सोपवली जातात. प्रवेश प्रक्रियेच्यावेळी माध्यमिक शाळेच्या लिपिक व शिपायांची मदत घेवून त्यांनाही कामे दिली जातात. काही वेळा शिक्षकांची ही मदत घेवून त्यांना कामे दिली जातात.

**अन्वयार्थ –**

यावरुन असे लक्षात येते की, कार्यालयीन कामाची विभागणी करण्यासाठी काही कनिष्ठ महाविद्यालयांमधून समिती स्थापली जाते. तसेच लिपिकाकडे शासकीय कामे सोपविली जातात व वेळ पडेल तेव्हा माध्यमिकच्या लिपिकाचीही मदत घेतली जाते व शिक्षकांना ही काही प्रमाणात कामे सांगितली जातात.

**निष्कर्ष –**

कामाची विभागणी समिती स्थापन करुन त्यांच्याद्वारा केली जाते. पण शिक्षकांनाही या प्रक्रियेत सहभागी केल्याने अध्यापन कार्यावर त्याचा परिणाम होतो.

**प्रश्न – कनिष्ठ महाविद्यालयीन कामकाजाचे नियोजन केव्हा केले जाते ?**

**विश्लेषण –**

कनिष्ठ महाविद्यालयीन कामकाजाचे नियोजन केव्हा केले जाते असे विचारले असा अशी माहिती मिळाली की, कामकाजाचे नियोजन हे दर सहा महिन्याला केले जाते. तसेच काहीजण वर्षाच्या सुरुवातीस जून महिन्यातच करतात. तसेच काहीजण जून, नोव्हेंबर मध्ये करतात.

**अन्वयार्थ –**

यावरुन असा अन्वयार्थ लावला जातो की, कामाचे नियोजन हे वर्षारंभी जून मध्ये व द्वितीय सत्रात नोव्हेंबर मध्ये केले जाते. यामुळे कामकाजामध्ये पूर्वनियोजितपणा येतो व काम व्यवस्थित पार पडते.

**निष्कर्ष –**

कामकाजाचे नियोजन हे वर्षाच्या सुरुवातीस जूनमध्ये केले जाते. पण प्रत्येक महिन्याला नियोजन करण्याची पद्धती आढळली नाही.

**प्रश्न – कनिष्ठ महाविद्यालयामध्ये लागणाऱ्या शैक्षणिक साधनांच्या खरेदीचे नियोजन कसे करता ?**

**विश्लेषण –**

लागणाऱ्या शैक्षणिक साधनांच्या खरेदीचे नियोजन हे अनुदानातून येणाऱ्या पैशावर तसेच लोकवर्गणी, देणगी, स्वीकारुन, संस्थेकडून काही प्रमाणात मिळवले जाते. काही वेळा शिक्षकांच्याकडून देणगी स्वीकारुन शैक्षणिक साधनांची खरेदी केली जाते.

**अन्वयार्थ –**

यावरुन असा अन्वयार्थ लावता येतो की शैक्षणिक साधनाच्या खरेदीचे नियोजन हे येणाऱ्या अनुदानातून तसेच लोकवर्गणी तसेच देणगी स्वीकारली जाते. शिक्षकाकडूनही देणगी घेवून शैक्षणिक साधनांची खरेदी केली जाते.

**निष्कर्ष –**

शैक्षणिक साधनांची खरेदी अनुदान व देणगी च्या रकमेतून केली जाते. पण शिक्षकांकडूनही देणगी घेतल्याने त्यांच्यामध्ये नाराजी असते.

**प्रश्न – कनिष्ठ महाविद्यालयाच्या गुणवत्तावाढीसाठी भावी उपाययोजन कोणत्या करता?**

**विश्लेषण –**

गुणवत्तावाढीसाठी कोणत्या उपाययोजना करता असे विचारले असता माहिती मिळाली की, विद्यार्थ्यांसाठी रात्रअभ्यासिका सुरु केली आहे. तज्ज्ञ अशा व्यक्तींचे व्याख्यान आयोजित केले जाते. अभ्यासात मागे असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पुन:अध्यापन करण्यासाठी वेळ शिल्लक ठेवला जातो. विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन केले जाते.

**अन्वयार्थ -**

यावरुन असा अन्वयार्थ लावला जातो की, गुणवत्तावाढीसाठी विद्यार्थ्यांना रात्रअभ्यासिका उपलब्ध करून दिली जाते. तसेच तज्ज्ञ, अनुभवी व्यक्तिंना व्याख्यानासाठी बोलावले जाते. विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन करुन अडचणी समजून घेतल्या जातात व त्यावर उपाययोजना केल्या जातात. तसेच अभ्यासात मागे पडलेल्या विद्यार्थ्यांना पुन्हा अध्यापन केले जाते. अशा उपाययोजना केल्या जातात.

**निष्कर्ष -**

गुणवत्तावाढीसाठी रात्रअभ्यासिका, वैयक्तिक मार्गदर्शन, तज्ज्ञ व्यक्तींचे व्याख्यान व उजळणी वर्ग आयोजित केले जातात. पण यामुळे शिक्षकांना कामाचा अतिरिक्त ताण पडतो.

**प्रश्न - कनिष्ठ महाविद्यालयामध्ये प्रत्येक उपक्रमाचा प्रमुख म्हणून कोणाची निवड केली जाते ?**

**विश्लेषण -**

प्रत्येक उपक्रमाचा प्रमुख म्हणून कोणाची नियुक्ती करता अस विचारले असता अशी माहिती मिळाली की, उपक्रमाचा प्रमुख म्हणून सेवाजेष्ठतेनुसार शिक्षकाची, संबंधीत उपक्रमामध्ये तज्ज्ञ, अनुभवी असणाराची तसेच आवड, क्षमता असणाराची उपक्रमाचा प्रमुख म्हणून निवड केली जाते.

**अन्वयार्थ -**

यावरुन असे दिसून येते की जो उपक्रम आहे त्या उपक्रमासंबंधात तज्ज्ञ व अनुभवी तसेच तो उपक्रम पार पाडण्यासाठी क्षमता व आवड असणाऱ्या शिक्षकाची तसेच अनुभवी व सेवा जेष्ठतेनुसार एखाद्या जेष्ठ शिक्षकाची उपक्रमाचा प्रमुख म्हणून निवड करतात. त्यामुळे उपक्रम व्यवस्थीतपणे पार पाडण्यास मदत होते.

**निष्कर्ष -**

उपक्रमाचा प्रमुख म्हणून अनुभवो व ज्येष्ठ अशा व आवड आणि क्षमता असणाऱ्या शिक्षकाची निवड केली जाते. पण सर्वच महाविद्यालयात असे शिक्षक असतीलच असे नाही.

**प्रश्न - प्रत्येकाच्या कामाची आखणी करताना कोणत्या गोष्टीचा विचार करता ?**

**विश्लेषण -**

प्रत्येकाच्या कामाची आखणी करताना त्यांची पात्रता त्यांच्यामध्ये असणाऱ्या क्षमता, त्याची कामाबाबत असणारी आवड व आस्था, कामाबाबत असणारा अनुभव व उत्कृष्ट काम करेल का ? या गोष्टींचा विचार केला जातो. अशी माहिती प्रति.सादकाकडून मिळाली.

**अन्वयार्थ -**

यावरुन असे दिसून येते की, पात्रता तसेच काम करण्याची क्षमता, असणारी कामाबाबत आस्था, आवड तसेच कामाबाबतीला अनुभव व उत्कृष्ट पद्धतीने काम पार पाडेल का इत्यादी सर्व गोष्टींचा विचार करुन कानाची आखणी केली जाते. त्यामुळे काम व्यवस्थितपणे व वेळेत पार पडण्यास मदत होते.

**निष्कर्ष -**

कामाची आखणी करताना कामाचे स्वरुप, अनुभव, क्षमता आणि कामाबाबत असणारी आस्था या गोष्टींचा विचार केला जातो.

**प्रश्न - परीक्षेसंबंधी नियोजन करताना कोणत्या घटकांचा विचार केला जातो ?**

**विश्लेषण -**

परीक्षेसंबंधी नियोजन करताना कोणत्या घटकांचा विचार केला जातो असे विचारले असता अशी माहिती मिळाली की, उपलब्ध असणाऱ्या शिक्षकांचा, वर्गखोल्यांचा, फर्निचर, सुरक्षा व्यवस्था, पाणी, वीज इत्यादी घटकांचा विचार केला जातो.

**अन्वयार्थ -**

यावरुन असा अन्वयार्थ लावता येतो की, परीक्षेसंबंधी नियोजन करत असताना आवश्यक असणारे पिण्याचे पाणी, बैठक व्यवस्थेसाठी फर्निचर, वर्गखोल्या तसेच पर्यवेक्षणासाठी शिक्षकांच्या उपलब्धतेचा विचार केला जातो. यामुळे परीक्षा व्यवस्थित व सुरळीतपणे पार पाडता येतात.

**निष्कर्ष -**

परीक्षांचे नियोजन करताना शिक्षक संख्या, वर्गखोल्या व फर्निचर या घटकांचा विचार केला जातो.

**प्रश्न - निकाल वाढविण्यासाठी कोणत्या उपाययोजना करता ?**

**विश्लेषण -**

निकाल वाढविण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या जातात असे विचारता असा प्रति.साद मिळाला की, विद्यार्थ्यांकडून प्रश्न पत्रिका सोडवून घेतल्या जातात. प्रत्येक घटकावर चाचणी घेतली जाते, अभ्यासात मागे असणाऱ्या विद्यार्थ्यांना जादा तासिका घेवून शिकवले जाते. वैयक्तिक मार्गदर्शन करुन अडचणी सोडविण्याचा प्रयत्न केला जातो. तसेच उत्तरे कशी लिहावीत याविषयी मार्गदर्शन केले जाते.

**अन्वयार्थ –**

यावरुन असा अन्वयार्थ लावता येतो की, परीक्षांचे निकाल वाढावेत म्हणून विद्यार्थ्यांच्याकडून प्रश्नपत्रिका सोडवून घेतल्या जातात व उत्तरे कशी लिहावीत यासाठी मार्गदर्शन केले जाते. वर्गातील जे विद्यार्थी अभ्यासात मागे आहेत त्यांच्यासाठी जादा तास घेतले जातात आणि प्रत्येक घटकावर घटकचाचणी घेवून विद्यार्थ्यांची तयारी करून घेतली जाते. त्यामुळे निकाल वाढण्यास मदत होते.

**निष्कर्ष –**

वेळोवेळी घटकचाचण्या घेवून विद्यार्थ्यांना उत्तरे लिहिण्यासाठी मार्गदर्शन तसेच जादा तास व प्रश्नपत्रिका सोडवून घेवून निकाल वाढवण्याचा प्रयत्न केला जातो.

**प्रश्न – विद्यार्थ्यांना कोणकोणत्या शिष्यवृत्या मिळवून देता ?**

**विश्लेषण –**

विद्यार्थ्यांना कोणकोणत्या शिष्यवृत्या मिळवून देता असे विचारता असा प्रति.साद मिळाला की, इ.बी.सी. शिष्यवृत्ती तसेच भारत सरकारच्या सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्या तसेच माजी सैनिकांच्या मुलांनाही शिष्यवृत्या मिळवून दिल्या जातात. शिवाय दोन सत्रामध्ये या उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला जातो.

**अन्वयार्थ –**

यावरुन असे दिसून येते की, भारत सरकारकडून मिळणाऱ्या वेगवेगळ्या प्रवर्गातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या शिष्यवृत्या तसेच इ.बी.सी. फी सवलत ही विद्यार्थ्यांना मिळवून दिली जाते. त्याचबरोबर जे माजी सैनिकांचे पाल्य आहेत त्यांनाही शिष्यवृत्या मिळवून देण्याचा प्रयत्न केला जातो. आणि या शिष्यवृत्या दिपावलीपूर्वी व एप्रिल मध्ये अशा दोन हप्त्यात मिळवून दिल्या जातात. त्यामुळे विद्यार्थ्यांना त्याचा वापर योग्य तऱ्हेने व अडचणीच्या वेळेस करता येतो.

**निष्कर्ष –**

भारत सरकारच्या सर्व प्रकारच्या सर्व प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्या व इ.बी.सी. सवलत मिळवून दिली जाते.

**प्रश्न – कनिष्ठ महाविद्यालय माध्यमिक शाळेला जोडलेले असता कोणते फायदे व तोटे होतात ?**

**विश्लेषण –**

कनिष्ठ महाविद्यालय माध्यमिक शाळेला जोडलेले असता कोणते फायदे – तोटे होतात असे विचारले असता पाच पैकी तीन प्राचार्यांनी पुढीलप्रमाणे माहिती दिली.

**फायदे –**

१) विद्यार्थ्यांमध्ये शिस्त राखता येते. २) ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना सोयीचे ठरते, विद्यार्थ्यांच्या उपस्थितीचे प्रमाण टिकून राहते. ३) प्रवेशाचा प्रश्न सुटतो, सुविधांचा लाभ मिळतो. ४) विद्यार्थ्यांना ग्रंथालयाचा वापर करता येतो, कार्यालयीन कामासाठी माध्यमिक शाळेतील लोकांची वेळप्रसंगी मदत घेता येते. अशा स्वरुपाचे अनेक फायदे होतात असे सांगितले. तसेच काही तोटे ही सांगितले –

**तोटे –**

१) इमारतीच्या कारणामुळे शाळा दोन सत्रामध्ये भरवावी लागते. २) तासिका कमी वेळाच्या कराव्या लागतात. ३) विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष देता येत नाही. ४) मोठ्या मुलांचा लहान मुलांना त्रास होतो. अशा प्रकारचे काही तोटे ही सहन करावे लागतात. अशी माहिती मिळाली.

**अन्वयार्थ –**

यावरुन असा अन्वयार्थ लावतो येतो की, कनिष्ठ महाविद्यालय माध्यमिक शाळेला संलग्न असल्यामुळे आकरावी प्रवेशाचा प्रश्न सुटतो, माध्यमिकचे ग्रंथालय वापरता येते. तसेच इतर कर्मचाऱ्यांची मदत घेता येते आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची सोयही होते त्यामुळे उपस्थितीचे प्रमाण टिकून राहण्यास मदत होते. अशा प्रकारचे फायदे होतात. पण त्याचबरोबर काही तोटे सहन करावे लागतात. ते म्हणजे शाळा दोन सत्रामध्ये भरवावी लागते. त्यामुळे

तासिका कमी वेळेच्या कराव्या लागतात व लहान व मोठी मुले एकत्र असल्यामुळे मोठ्यांचा त्रास लहान मुलांना काही प्रमाणात होतो.

**निष्कर्ष -**

माध्यमिक शाळेशी कनिष्ठ महाविद्यालय संलग्न असल्यामुळे तोटे कमी पण फायदे जास्त होतात.

**प्रश्न - कनिष्ठ महाविद्यालय वरिष्ठ महाविद्यालयास संलग्न असल्यामुळे कोणते फायदे - तोटे होतात ?**

**विश्लेषण -**

वरिष्ठ महाविद्यालयाशी संलग्न असल्यामुळे कनिष्ठ महाविद्यालय चालविताना कोणते फायदे व तोटे होतात असे विचारले असता पाचपैकी दोन (४०%) प्राचार्यांनी सांगितले की प्रयोगशाळा सुसज्ज असते, इमारत व वर्ग मोठे असतात, ग्रथांलयातील इतर पुस्तकांचा लाभ मिळतो. ग्रंथालय समृद्ध बनते. विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या कार्यक्रमांचा व व्याख्यानांचा लाभ मिळतो, वरिष्ठ शिक्षकांचे मार्गदर्शन मिळते. क्रीडांगण मोठे असते शिवाय क्रिडा साहित्य भरपूर प्रमाणात उपलब्ध होते, तसेच वरिष्ठ महाविद्यालयातील सेवक व विद्यार्थ्यांची मदत घेता येते. अशा स्वरुपाचे फायदे होतात पण काही तोटे ही होतात आणि ते तोटे म्हणजे वरिष्ठ विद्यार्थ्यांच्या वाईट सवयींमुळे शिस्त बिघडते, उपस्थितीचे प्रमाण कमी होते, विद्यार्थी राजकीय प्रवृत्तीचे बनतात तसेच कार्यालयीन कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण पडतो.

**अन्वयार्थ -**

यावरुन असा अन्वयार्थ लावला जातो की, कनिष्ठ महाविद्यालय हे वरिष्ठ महाविद्यालयाशी संलग्न असल्यामुळे ग्रंथालय समृद्ध व परीपूर्ण बनते. तसेच वरिष्ठ वर्गासाठी आयोजित तज्ज्ञ लोकांच्या व्याख्यानाचा व मार्गदर्शनाचा फायदा ही मिळतो. शिवाय दोन्हीचे एकत्र मिळून क्रिडांगण मोठे असते व क्रिडासाहित्य मुबलक प्रमाणात उपलब्ध होते. त्यामुळे

प्रत्येक विद्यार्थ्याला त्याचा वापरही करता येतो. प्रवेशाच्या वेळी वरिष्ठ वर्गाच्या कर्मचाऱ्यांचे सहकार्य घेता येते. त्यामुळे प्रवेश प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडता येते. अशा प्रकारचे फायदे कनिष्ठ महाविद्यालयास होतात. पण या फायद्याबरोबरच काही महत्वाचे तोटेही होतात. वरिष्ठ वर्गातील मुले राजकीय लोकांच्या सान्निध्यात येतात त्यामुळे त्यांच्यावर या लोकांचा प्रभाव पडतो. त्यामुळे राजकीय वातावरण महाविद्यालयामध्ये निर्माण होते. तसेच विद्यार्थी वरिष्ठ विद्यार्थ्यांच्या संगतीमुळे वाईट मार्गाला लागण्याचा धोका असतो. तसेच वर्गामध्ये विद्यार्थी बाहेरच फिरतात त्यामुळे गैरहजेरीचे प्रमाण वाढते. अशा प्रकारचे असे दिसून येते.

**निष्कर्ष –**

वरिष्ठ महाविद्यालयाला कनिष्ठ महाविद्यालय संलग्न असल्यामुळे विद्यार्थी जीवनावर व प्रशासनावर वाईट परिणाम होतो.

**प्रश्न – कनिष्ठ महाविद्यालयीन संस्थांतर्गत शैक्षणिक नियोजन आणि प्रशासनासाठी सुधारणात्मक उपाय योजना सांगा ?**

**विश्लेषण –**

कनिष्ठ महाविद्यालयीन संस्थांतर्गत नियोजन आणि प्रशासनासाठी प्राचार्यांनी पुढील सुधारणात्मक उपाय सांगितले आहेत.

१) कनिष्ठ महाविद्यालय हा विभाग स्वतंत्र असावा.

२) स्वतंत्रपणे प्रशासन असावे.

३) विद्यार्थी संख्या प्रत्येक वर्गात मर्यादित असावी.

४) प्राचार्यांना स्वायत्तता मिळावी.

५) प्राध्यापकांच्या शैक्षणिक पात्रता, सेवाशर्ती व पगार यासाठी स्वतंत्र नियमावली असावी.

६) कनिष्ठ महाविद्यालयीन स्तर पूर्णत: व्यावसायाभिमुख करावा.

७) राजकीय हस्तक्षेप शिक्षण क्षेत्रामध्ये होवू देवू नये.

८) माध्यमिक शाळांशी संलग्न कनिष्ठ महाविद्यालयीन वर्गाच्या तासिकेचा कालावधी वाढवावा.

९) कर्मचारी संख्या वाढवावी.

१०) मिळणारे अनुदान वेळेत मिळावे.

११) शिक्षकांच्या पाठ टाचणाची तपासणी सतत करावी.

१२) शिक्षकांना सतत बदलून जबाबदाऱ्या द्याव्यात.

**अन्वयार्थ -**

यावरुन असे लक्षात येते की, कनिष्ठ महाविद्यालयीन स्तर हा स्वतंत्रपणे विभाग म्हणून निर्माण करावा त्याचे स्वतंत्रपणे व्यवस्थापन व प्रशासन करावे आणि राजकीय हस्तक्षेप होवू नये कारण प्रशासन करताना अडचणी निर्माण होतात तसेच प्राचार्यांच्या हाती पूर्ण स्वायत्तता द्यावी त्यामुळे त्यांना त्यांच्या अनुभवांचा, विचारांचा पूर्णत: वापर करण्यासाठी वाव मिळू शकेल. माध्यमिकशी संलग्नित कनिष्ठ महाविद्यालयीन वर्गाच्या तासिकेचा कालावधी वाढवावा. तसेच कर्मचारी संख्या आवश्यकतेनुसार वाढवून मिळावी व ज्या गोष्टींसाठी अनुदान मिळते ते वेळेवर मिळावे जेणेकरुन त्याचा योग्य वापर केला जावू शकेल. अशा प्रकारच्या सुधारणात्मक बाबी सांगितल्या.

# शिक्षकाकडून प्रश्नावलीद्वारा मिळालेल्या माहितीचे विश्लेषण -

## १) तुम्ही काम करत असलेल्या कनिष्ठ महाविद्यालयाचा प्रकार कोणता ?

**कोष्टक क्र. ५.३९**

**कनिष्ठ महाविद्यालयाच्या माहितीविषयीचे विश्लेषण**

| अ.क्र. | प्रति.सादाचे स्वरुप | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | स्वतंत्र | ०० | ०० |
| २. | माध्यमिक शाळेला जोडलेले | ०३ | ६० |
| ३. | वरिष्ठ महाविद्यालयाला जोडलेले | ०२ | ४० |
| | एकूण | ०५ | १००% |

**निरीक्षण -**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की स्वतंत्र कनिष्ठ महाविद्यालय नाही तर माध्यमिक शाळेला जोडलेली ०३(६०%) कनिष्ठ महाविद्यालये असून वरिष्ठ महाविद्यालयास जोडलेली ०३ (६०%) कनिष्ठ महाविद्यालये असून वरिष्ठ महाविद्यालयास जोडलेली ०२ (४०%) कनिष्ठ महाविद्यालये आहेत.

**अर्थनिर्वचन -**

यावरुन असे दिसून येते की, पंढरपूर शहरामध्ये तीन कनिष्ठ महाविद्यालये ही माध्यमिक शाळेला जोडलेली आहेत तर दोन कनिष्ठ महाविद्यालये ही वरिष्ठ महाविद्यालयाला जोडलेली असून एकही स्वतंत्र अशा स्वरुपाचे कनिष्ठ महाविद्यालय नाही.

**निष्कर्ष -**

पंढरपूर शहरामध्ये स्वतंत्र अशा स्वरुपाचे एकही कनिष्ठ महाविद्यालय नाही.

२) तुम्ही ज्या पदावर कार्यरत आहात त्या पदाचे स्वरुप कसे आहे ?

**कोष्टक क्र. – ५.४०**

**पदाच्या स्वरुपाविषयीच्या माहितीचे विश्लेषण**

| अ.क्र. | पदाचे स्वरुप | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | तात्पुरते | ०० | ०० |
| २. | सी.एच.बी. | ०५ | ७.१४ |
| ३. | कायमस्वरुपी | ६५ | ९२.८५ |
| | एकूण | ०५ | १००% |

**निरीक्षण –**

वरील सारणीवरुन असे दिसून येते की तात्पुरत्या स्वरुपाच्या पदावर शिक्षक नाहीत तर सी.एच.बी. पदावर ०५ (०७.१४%) शिक्षक असून ६५ (९२.८५%) शिक्षक हे कायमस्वरुपी पदावर कार्यरत आहेत.

**अर्थनिर्वचन –**

यावरुन असे दिसून येते की पंढरपूर शहरातील कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये कायमस्वरुपी शिक्षक पदावर सर्वात जास्त शिक्षक आहेत तर तात्पुरत्या पदावर एकही शिक्षक नसून सी.एच.बी. पदावर थोड्या प्रमाणात शिक्षक आहेत.

**निष्कर्ष –**

पंढरपूर शहरातील कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये ९२% शिक्षक कायमस्वरुपी पदावर कार्यरत आहेत.

३) तुम्ही काम करत असलेले कनिष्ठ महाविद्यालय कोणत्या स्वरूपाचे आहे ?

**कोष्टक क्र. - ५.४१**

**कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रकारच्या माहितीचे विश्लेषण**

| अ.क्र. | कनिष्ठ महाविद्यालयाचा प्रकार | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | अनुदानित | ७० | १०० |
| २. | विनाअनुदानित | ०० | ०० |
| ३. | अंशत: अनुदानित | ०० | ०० |
| | एकूण | ७० | १००% |

**निरीक्षण -**

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, ७०(१००%) प्राध्यापकांच्या मते ते काम करत असलेले कनिष्ठ महाविद्यालय अनुदानित आहे. ००(००%) शिक्षक विनाअनुदानीत तर ००(००%) शिक्षक अंशत: अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयामध्ये काम करतात.

**अर्थनिर्वचन -**

यावरून असा अन्वयार्थ लावता येतो की, सर्वच्या सर्व ७० शिक्षक अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयामध्ये काम करतात. एकही शिक्षक असा नाही की तो विनाअनुदानित किंवा अंशत:अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयामध्ये काम करते.

**निष्कर्ष -**

सर्वच्या सर्व शिक्षक अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयामध्ये काम करतात.

४) तुमच्या कनिष्ठ महाविद्यालयामध्ये खालीलपैकी कोणत्या भौतिक सुविधा आहेत.

**कोष्टक क्र. – ५.४२**

**कनिष्ठ महाविद्यालयाच्या भौतिक सुविधांचे विश्लेषण**

| अ.क्र. | भौतिक सुविधा | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | पोर्च, स्वच्छता गृह व पिण्याचे पाणी | १२ | १७.१५ |
| २. | क्रिडांगण,जिमखाना | ०० | ०० |
| ३. | इतर | ०० | ०० |
| ४. | वरील सर्व | ५८ | ८२.८५ |
| | एकूण | ७० | १०० |

**निरीक्षण –**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, १२ (१७.१५%) शिक्षकांनी कनिष्ठ महाविद्यालयामध्ये पोर्च, टॉयलेट, व पिण्याचे पाणी इ. सुविधा आहेत असे सांगितले तर ५८(८२.८५%) शिक्षकांनी वरील सर्व भौतिक सुविधा आहेत असे सांगितले.

**अर्थनिर्वचन –**

यावरुन असा अन्वयार्थ लावता येतो की, १२ शिक्षकांनी त्यांच्या कनिष्ठ महाविद्यालयामध्ये फक्त पिण्याचे पाणी, पोर्च व टॉयलेट इ. सुविधा आहेत असे सांगितले तर ५८ शिक्षकांनी सांगितले की पोर्च, टॉयलेट, पिण्याचे पाणी क्रिडांगण, जिमखाना या सर्व भौतिक सुविधा आहेत असे सांगितले.

**निष्कर्ष –**

जवळ – जवळ ८०% शिक्षकांच्या कनिष्ठ महाविद्यालयामध्ये पोर्च, टॉयलेट, पिण्याचे पाणी, क्रिडांगण व जिमखाना इत्यादी सुविधा आहेत.

५) तुमच्या कनिष्ठ महाविद्यालयामधील वर्गखोलीचे क्षेत्रफळ किती आहे ?

**कोष्टक क्र. – ५.४३**

**कनिष्ठ महाविद्यालयामधील वर्गखोलीच्या क्षेत्रफळाच्या माहितीचे विश्लेषण**

| अ.क्र. | भौतिक सुविधा | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | २५ x ६० फूट | १२ | १७.१४ |
| २. | ३० x ८० फूट | २८ | ३९.९९ |
| ३. | ४० x ९० फूट | ३० | ४२.९९ |
| | एकूण | ७० | १००.०० |

**निरीक्षण –**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, १२ (१७.१४%) शिक्षकांनी वर्गखोलीचे क्षेत्रफळ २५ बाय ६० फुट आहे असे सांगितले. तर २८(३९.९९%) शिक्षकांनी ३० बाय ८० फूट तसेच ३० (४२.९९%) शिक्षकांनी ४० बाय ९० फूट वर्गखोलीचे क्षेत्रफळ आहे असे सांगितले.

**अर्थनिर्वचन –**

यावरुन असा अन्वयार्थ लावता येतो की ३० शिक्षकांनी वर्गखोल्याचे क्षेत्रफळ ४० बाय ९० फूट सांगितले. तसेच २८ शिक्षकांनी वर्गखोल्याचे क्षेत्रफळ ३० बाय ८० फूट असे सांगितले. तर १२ शिक्षकांनी २५ बाय ६० फूट क्षेत्रफळ सांगितले. वर्ग खोल्या या आकाराने मोठ्या असाव्यात.

**निष्कर्ष –**

४२.९९ % शिक्षकांच्या मते वर्गखोल्याचे एकूण क्षेत्रफळ ४० बाय ९० फूट आहे. तर ३९.९९% शिक्षकांनी ३० बाय ८० फूट क्षेत्रफळ सांगितले. तसेच १७.१४ % शिक्षकांच्या मते २५ बाय ६० फूट आहे असे सांगितले.

६) अध्यापनाचे वार्षिक नियोजन करता काय ?

**कोष्टक क्र. – ५.४४**

**अध्यापनाचे वार्षिक नियोजनाच्या माहितीचे विश्लेषण**

| अ.क्र. | भौतिक सुविधा | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | सतत | ६० | ८५.६७ |
| २. | के व्हातरी | १० | १४.२८ |
| ३. | कधीच नाही | ०० | ०० |
| | एकूण | ७० | १०० |

**निरीक्षण –**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, अध्यापनाचे वार्षिक नियोजन ६० (८५.७१%) शिक्षक सतत करतात, १० (१४.२८ %) शिक्षक केव्हातरी अध्यापनचे वार्षिक नियोजन करतात.

**अर्थनिर्वचन –**

यावरुन असा अन्वयार्थ लावता येतो की आपल्या अध्यापनाचे वार्षिक नियोजन ६० शिक्षक सतत तर १० शिक्षक केव्हातरी नियोजन करतात. अध्यापन कार्याचे नियोजन केल्यामुळेच वेळेत पाठ्यक्रम पूर्ण होतो.

**निष्कर्ष –**

आपल्या अध्यापनकार्याचे सतत वार्षिक नियोजन करणारे जास्तीत जास्त (८५.७१%) शिक्षक आहेत तर १४.२८ शिक्षक अध्यापनाचे केव्हातरी वार्षिक नियोजन करतात.

७) वर्ग अध्यापनाचे नियमित नियोजन करता काय ?

**कोष्टक क्र. – ५.४५**

**वर्ग अध्यापनाच्या नियोजनाच्या माहितीचे विश्लेषण**

| अ.क्र. | प्रति.सादाचे स्वरुप | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ५१ | ७२.८५ |
| २. | नाही | ०५ | ७.१४ |
| ३. | कधीतरी | १४ | १९.९९ |
| | एकूण | ७० | १०० |

**निरीक्षण –**

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, वर्ग अध्यापनाचे नियमित नियोजन करता काय असे विचारले असता ५१(७२.८६%) शिक्षकांनी होय असे, ०५(०७.१४%) शिक्षकांनी नाही तर १४ (१९.९९%) शिक्षकांनी कधीतरी वर्गअध्यापनाचे नियोजन करतो असे सांगितले.

**अर्थनिर्वचन –**

यावरुन असा अन्वयार्थ लावता येतो की, वर्ग अध्यापनाचे नियमीत नियोजन ५१(७२.८६%) शिक्षक करतात. तर १४ (१९.९९%) शिक्षक कधीतरी वर्ग अध्यापनाचे नियोजन करतात. पण ०५ (०७.१४%) शिक्षक हे वर्ग अध्यापनाचे नियमित नियोजन करत नाहीत. परंतु नियमित नियोजन करणे हे आवश्यक आहे.

**निष्कर्ष –**

आपल्या वर्ग अध्यापन कार्याचे नियमीत नियोजन जास्तीत जास्त ७२.८६% शिक्षक करतात, कधीतरी नियोजन १९.९९ % तर ०७.१४ % शिक्षक कधीच वर्ग अध्यापनाचे नियोजन करत नाहीत.

८) खालील अध्यापन कार्याचे नियोजन करताना इतरांचे सहकार्य मिळते काय ?

**कोष्टक क्र. – ५.४६**

**अध्यापन कार्याचे नियोजन करताना इतरांचे सहकार्य मिळण्याच्या माहितीचे विश्लेषण**

| अ.क्र. | प्रति.सादाचे स्वरुप | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ३३ | ४७.१४ |
| २. | नाही | २६ | ३७.१४ |
| ३. | कधीतरी | ११ | १५.७१ |
| | एकूण | ७० | १०० |

**निरीक्षण –**

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, अध्यापन कार्याचे नियोजन करताना ३३(४७.१४%) शिक्षकांना इतरांचे सहकार्य मिळते २६ (३७.१४ %) शिक्षकांना इतरांचे सहकार्य कधीतरी मिळते.

**अर्थनिर्वचन –**

यावरुन असा अन्वयार्थ लावता येतो की, अध्यापन कार्याचे नियोजन, करताना ३३(४७.१४ %) शिक्षकांना इतरांचे सतत सहकार्य मिळते पण २६ (३७.१४ %) शिक्षकांना इतरांचे सहकार्य कधीच मिळत नाही. आणि ११ (१५.७१ %) शिक्षकांना अध्यापन कार्याचे नियोजन करताना इतरांचे सहकार्य कधीतरीच मिळते. इतरांच्या सहकार्यामुळे अडचणी दूर करता येवू शकतात म्हणून घ्यावे लागते.

**निष्कर्ष –**

अध्यापन कार्याचे नियोजन करताना ४७.१४% शिक्षकांना इतरांचे सहकार्य मिळते तर ३७.१४ % शिक्षकांना इतरांचे सहकार्य मिळत नाही. तर १५.७१ % शिक्षकांना कधीतरी सहकार्य मिळते.

**आपणास प्रशासकीय काम करावे लागते का ?**

**कोष्टक क्र. – ५.४७**

**प्रशासकीय काम करण्याच्या माहितीचे विश्लेषण**

| अ.क्र. | प्रति.सादाचे स्वरुप | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | सतत | ०३ | ४.२८ |
| २. | कधी कधी | ४९ | ६९.९९ |
| ३. | कधीच नाही | १८ | २५.७१ |
| | एकूण | ७० | १०० |

**निरीक्षण –**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, प्रशासकीय काम करावे लागते काय 'असे विचारले असता' ४९ (६९.९९ %) शिक्षकांनी कधी-कधी करावे लागते असे सांगितले. ०३(०४.२८ %) शिक्षकांनी सतत प्रशासकीय काम करावे लागते असे सांगितले तर १८ (२५.७१ %)शिक्षकांनी प्रशासकीय काम कधीच करावे लागत नाही असे सांगितले.

**अर्थनिर्वचन –**

यावरुन असा अन्वयार्थ लावता येतो की, ७० पैकी ४९ शिक्षकांना प्रशासकीय कामे कधी-कधी तरी करावी लागतात. पण १८ शिक्षकांना प्रशासकीय कामे कधीच नसतात. तर ०३ शिक्षकांना प्रशासकीय कामे ही सतत करावी लागतात. शिक्षक हे प्राचार्यांना वेळप्रसंगी मदत करतात. त्यामुळे प्राचार्य त्यांचा सहयोग घेवू शकतात.

**निष्कर्ष –**

जवळ – जवळ ०४.२८ % शिक्षकांनाच फक्त प्रशासकीय कामे सतत करावी लागतात तर २५.७१ % शिक्षकांना कधीच प्रशासकीय कामे नसतात. पण ६९.९९ % शिक्षकांना प्रशासकीय कामे कधी – कधी करावी लागतात.

आपणास कोणकोणते प्रशासकीय काम करावे लागते ?

**कोष्टक क्र. ५.४८**

**प्रशासकीय कामाच्या माहितीचे विश्लेषण**

| अ.क्र. | प्रशासकीय कामाचे स्वरुप | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | अहवाल लेखन | २१ | २९.९९ |
| २. | हजेरी पत्रक | २२ | ३१.४२ |
| ३. | प्रवेश | १५ | २१.४२ |
| ४. | वरील सर्व | १२ | १७.१४ |
| | एकूण | ७० | १०० |

**निरीक्षण :**

वरील कोष्टकावरून असे दिसून येते २१(२९.९९%) शिक्षकांना अहवाल लेखन करावे लागते तर २२(३१.४२%) शिक्षकांना हजेरीपत्रक तयार करावे लागते १५(२१.४२%)शिक्षकांना प्रवेशाचे काम करावे लागते तर १२(१७.१४%) शिक्षकांना अहवाल लेखन, हजेरी पत्रक व प्रवेशासंबंधी कामे करावी लागतात.

**अर्थनिर्वचन –**

यावरून असा अन्वयार्थ लावता येतो, की ७० पैकी २१ शिक्षकांना अहवाल लेखनाचे काम करावे लागते २२ शिक्षकांना हजेरी पत्रक तयार करावे लागते तसेच प्रवेश प्रक्रियेच्यावेळी कामे १५ शिक्षकांना करावी लागतात. तर १२ शिक्षकांना अहवाल लेखन, हजेरीपत्रक व प्रवेश प्रक्रियेसंबंधी सर्व कामे करावी लागतात.

**निष्कर्ष –**

शिक्षकांना अध्यापन कार्याबरोबरच अहवाल लेखन, हजेरीपत्रक तयार करणे व प्रवेश प्रक्रियेची कामे करावी लागतात.

**प्रशासकीय कामाचा परिणाम अध्यापन कार्यावर होतो का ?**

**कोष्टक क्र. – ५.४९**

**प्रशासकीय कामाचा अध्यापन कार्यावर होणाऱ्या परिणामाच्या माहितीचे विश्लेषण**

| अ.क्र. | प्रति.सादाचे स्वरुप | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | नेहमी | १२ | १७.१४ |
| २. | काही वेळा | २१ | २९.९९ |
| ३. | कधीच नाही | ३७ | ५२.८५ |
| | एकूण | ७० | १०० |

**निरीक्षण –**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, प्रशासकी कामाचा परिणाम अध्यापनावर नेहमी होतो असे १२(१७.१४%) शिक्षकांनी सांगितले. तसेच प्रशासकीय कामाचा परिणाम अध्यापनावर काहीवेळा होतो असे २१(२९.९९%) शिक्षकांनी सांगितले. तर ३७(५२.८५%) शिक्षकांनी सांगितले की प्रशासकीय कामाचा अध्यापन कार्यावर काहीच परिणाम होत नाही.

**अर्थनिर्वचन –**

यावरुन असा अन्वयार्थ लावता येतो की, १२ शिक्षकांच्या मते प्रशासकीय कामाचा अध्यापनावर नेहमी परिणाम होतो. तसेच २१ शिक्षकांच्या मते प्रशासकीय कामाचा अध्यापनावर काहीवेळा परिणाम होतो तर ३७ शिक्षकांच्या मते प्रशासकीय कामाचा अध्यापनावर कधीच परिणाम होत नाही. प्रशासकीय कामामुळे अध्यापनाच्या तयारीला काहीवेळा वेळ कमी पडतो. त्यामुळे अध्यापनावर परिणाम होवू शकतो.

**निष्कर्ष –**

प्रशासकीय कामाचा अध्यापनावर कधीच परीणाम होत नाही असे ५२.८५% शिक्षकांचे मत आहे तर २९.९९% शिक्षकांच्या मते काहीवेळा परिणाम होतो.

## दैनंदिन अध्यापन कार्यासासाठी शैक्षणिक साधनांचा वापर करता का ?

**कोष्टक क्र. – ५.५०**

**दैनंदिन अध्यापन कार्यासाठी शैक्षणिक साधनांच्या वापराच्या माहितेचे विश्लेषण**

| अ.क्र. | प्रति.सादाचे स्वरुप | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | सतत | ५८ | ८२.८५ |
| २. | कधी–कधी | १२ | १७.१५ |
| ३. | कधीच नाही | ०० | ०० |
| | एकूण | ७० | १०० |

**निरीक्षण –**

वरील कोष्टकावरून असे दिसून येते की, दैनंदिन अध्यापन कार्यासाठी शैक्षणिक साधनांचा वापर ५८(८२.८५%) शिक्षक सतत करतात. तर १२(१७.१५%) शिक्षक दैनंदिन अध्यापन कार्यासाठी शैक्षणिक साधनांच वापर कधी – कधी तरी करतात. तर कधीच वापर न करणारे ००(००%) शिक्षक आहेत.

**अर्थनिर्वचन –**

यावरुन असा अन्वयार्थ लावता येतो की, ७० पैकी ५८ शिक्षक आपल्या दैनंदिन अध्यापन कार्यामध्ये शैक्षणिक साधनांचा सतत वापर करतात तर १२ शिक्षक कधी – कधी तरी वापर करतात. पण शैक्षणिक साधनांचा वापर अध्यापनामध्ये वापरणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष –**

आपल्या दैनंदिन अध्यापन कार्यामध्ये जवळ–जवळ ८२.८५ % शिक्षक शैक्षणिक साधनांचा सतत वापर करतात. तर १७.१५ % शिक्षक शैक्षणिक साधनांचा वापर अध्यापनात कधीतरी करतात.

**अध्यापनासाठी कोणकोणती शैक्षणिक साधने वापरता ?**

**कोष्टक क्र. – ५.५१**

**अध्यापनासाठी वापरावयाच्या शैक्षणिक साधनाबद्दलच्या माहितीचे विश्लेषण**

| अ.क्र. | शैक्षणिक साधनाचे स्वरुप | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | टेप रेकॉर्डर | १८ | २५.७१ |
| २. | ओ.एच.पी. | ४० | ५७.५४ |
| ३. | एल.सी.डी. | ०४ | ५.७१ |
| ४. | वरील सर्व | ०८ | ११.४२ |
| | एकूण | ७० | १०० |

**निरीक्षण –**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, अध्यापनामध्ये टेपरेकॉर्डरचा वापर १८ (२५.७१%) शिक्षक करतात. ४०(५७.५४%) शिक्षक ओ.एच.पी.चा वापर करतात. एल.सी.डी.चा वापर ०४(५.७१%) शिक्षक करतात तर ०८(११.४२%) शिक्षक टेपरेकॉर्डर ओ.एच.पी. व एल.सी.डी. या तिन्ही साधनांचा वापर करतात.

**अर्थनिर्वचन –**

यावरुन असा अन्वयार्थ लावता येतो की, आपल्या अध्यापन कार्यामध्ये टेप रेकॉर्डरचा वापर ७० पैकी १८ शिक्षक करतात. ४० शिक्षक आपल्या अध्यापन कार्यामध्ये फक्त ओ.एच.पी. चा वापर करतात. एल.सी.डी. वापर ०४ शिक्षक करतात. तर ०८ शिक्षक हे अध्यापन कार्यामध्ये टेप रेकॉर्डर, ओ.एच.पी व एल.सी.डी. या तिन्ही शैक्षणिक साधनांचा वापर करतात. या शैक्षणिक साधनामुळे अध्यापनात जिवंतपणा येतो.

**निष्कर्ष –**

शिक्षक अध्यापनामध्ये शैक्षणिक टेप रेकॉर्डर, ओ.एच.पी. एल.सी.डी. इ. साधनांचा वापर करतात.

**अध्यापन कार्याच्या वापरासाठी लागणाऱ्या सर्व प्रकारच्या शैक्षणिक साधनांची उपलब्धता तुमच्या कनिष्ठ महाविद्यालयामध्ये आहे काय ?**

**कोष्टक क्र. – ५.५२**

**शैक्षणिक साधनांच्या उपलब्धतेसंबंधी माहितीचे वर्गीकरण**

| अ.क्र. | प्रति.सादाचे स्वरुप | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | १२ | १७.१४ |
| २. | नाही | ५८ | ८२.८६ |
| | एकूण | ७० | १०० |

**निरीक्षण –**

वरील सारणीवरुन असे दिसून येते की अध्यापन कार्याच्या वापरासाठी लागणाऱ्या सर्व प्रकारच्या शैक्षणिक साधनांची उपलब्धता आहे असे १२(१७.१४%) शिक्षकांनी सांगितले. तर ५८(८२.८६%) शिक्षकांनी सर्व प्रकारच्या शैक्षणिक साधनांची उपलब्धता नाही असे सांगितले.

**अर्थनिर्वचन –**

यावरुन असा अन्वयार्थ लावता येतो की, दैनंदिन अध्यापन कार्याच्या वापरासाठी लागणाऱ्या सर्व प्रकारच्या शैक्षणिक साधनांची पुरेशी उपलब्धता नाही असे फक्त १२(१७.१४%) शिक्षकांचे मत आहे परंतु ८२.८६ % शिक्षकांच्या सांगण्यानुसार शैक्षणिक साधनांची उपलब्धता ही कमी आहे. पुरेशी शैक्षणिक साधने असल्याशिवाय अध्यापन कार्य प्रभावी करता येत नाही.

**निष्कर्ष –**

जवळ – जवळ ८२.८६ % शिक्षकांच्या मते दैनंदिन अध्यापन कार्यासाठी लागणाऱ्या सर्व प्रकारच्या शैक्षणिक साधनांची उपलब्धता नाही.

आपल्या अध्यापनाचा दर्जा सुधारावा म्हणून काय करता ?

**कोष्टक क्र. – ५.५३**

**अध्यापनाचा दर्जा सुधारण्याबाबतच्या माहितीचे विश्लेषण**

| अ.क्र. | दर्जा सुधारण्यासाठी उपाययोजना | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | सतत वाचन करतो | १९ | २७.१४ |
| २. | अगोदर पाठ-टाचण काढतो | २८ | ३९.९९ |
| ३. | दृक-श्राव्य शैक्षणिक साधनांचा वापर करतो | ५१ | ७२.८५ |
| ४. | इतर | ०७ | ९.९९ |
| | एकूण | ७० | १०० |

(टीप – काही प्रति.सादकांनी एक पेक्षा अधिक प्रति.साद दिल्यामुळे प्रति.सादक संख्या वाढली आहे.)

**निरीक्षण –**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, अध्यापनाचा दर्जा सुधारण्यासाठी १९(२७.१४%) शिक्षक सतत वाचन करतात. २८(३९.९९%) शिक्षक अगोदर पाठ टाचण काढतात. दृक-श्राव्य शैक्षणिक साधनांचा वापर ५१(७२.८५%) शिक्षक करतात व ०७(९.९९%) शिक्षक इतर अन्य गोष्टी करतात.

**अर्थनिर्वचन –**

यावरुन असा अन्वयार्थ लावता येतो की, अध्यापनाचा दर्जा सुधारावा म्हणून सर्व शिक्षक वेगवेगळे प्रयत्न करतात. त्यापैकी १९(२७.१४%) शिक्षक सतत वाचन करुन दर्जा सुधारण्याचा प्रयत्न करतात. २८(३९.९९%) शिक्षक हे अगोदर पाठ टाचण काढतात तर दृक-श्राव्य साधनांचा अध्यापनात वापर करुन अध्यापनाचा दर्जा सुधारण्याचा प्रयत्न ५१(७२.८५%) शिक्षक करतात. पण ०७(९.९९%)शिक्षक हे अन्य मार्गाचा वापर करुन दर्जा सुधारण्याचा प्रयत्न करतात.

**निष्कर्ष –**

अध्यापनाचा दर्जा सुधारण्यासाठी शिक्षक सतत वाचन करतात, अगोदर पाठ टाचण काढतात व दृक-श्राव्य साधनांचा वापरही करतात.

आपल्या महाविद्यालयामध्ये वर्गखोल्यांची संख्या कशी आहे ?

**कोष्टक क्र. ५.५४**

**महाविद्यालयातील वर्गखोल्यांच्या संख्येच्या माहितीचे विश्लेषण**

| अ.क्र. | प्रति.सादाचे स्वरुप | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | पुरेशी | ५० | ७१.४२ |
| २. | कमी | १२ | १७.१४ |
| ३. | गरजेपेक्षा जास्त | ०८ | ११.४३ |
| | एकूण | ७० | १०० |

**निरीक्षण –**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, वर्गखोल्यांची संख्या ही गरजेनुसार पुरेशी आहे असे ५०(७१.४२%) शिक्षकांनी सांगितले. १२(१७.१४%) शिक्षकांनी गरजेपेक्षा कमी वर्गखोल्या आहेत असे सांगितले. तर ०८ शिक्षकांनी वर्गखोल्यांची संख्या ही गरजेपेक्षा जास्त आहे असे सांगितले.

**अर्थनिर्वचन –**

यावरुन असा अन्वयार्थ लावता येतो की, ५०(७१.४२%) शिक्षकांच्या मतानुसार वर्गखोल्यांची संख्या ही गरजेनुसार आहे. पण १२ शिक्षकांच्या मतानुसार वर्गखोल्यांची संख्या पुरेशी नाही. म्हणजेच ती कमी आहेत. त्यामुळे त्यांना अडचणी येतात. तर ०८(११.४३%) शिक्षकांच्या मते वर्गखोल्या या गरजेपेक्षा जास्त आहेत. म्हणजे वर्गखोल्या मुबलक प्रमाणात उपलब्ध आहेत.

**निष्कर्ष –**

यावरुन असा निष्कर्ष काढता येतो की, ७१.४२% शिक्षकांच्या मते वर्गखोल्यांची संख्या पुरेशी आहे तर १७.१४% शिक्षकांच्या मते गरजेपेक्षा कमी वर्ग खोल्या आहेत.

तुम्हाला वेळापत्रकाप्रमाणेच अध्यापन कार्यासाठी तासिका मिळतात का ?

**कोष्टक क्र. – ५.५५**

**वेळापत्रकाप्रमाणेच अध्यापन कार्यासाठी तासिका मिळण्याच्या माहितीचे विश्लेषण**

| अ.क्र. | प्रति.सादाचे स्वरुप | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | नेहमी | ३७ | ५२.८५ |
| २. | काहीवेळा | १५ | २१.४२ |
| ३. | कधीच नाही | १८ | २५.७२ |
| | एकूण | ७० | १०० |

**निरीक्षण –**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, ३७(५२.८५%) शिक्षकांच्या मते अध्यापन कार्यासाठी वेळापत्रकाप्रमाणे नेहमी तासिका मिळतात. १५(२१.४२%) शिक्षकांच्या मते काहीवेळेला मिळतात. तर १८(२५.७२%) शिक्षकांनी सांगितले की वेळापत्रकाप्रमाणे कधीच तासिका मिळत नाहीत.

**अर्थनिर्वचन –**

यावरुन असा अन्वयार्थ लावता येतो की, ३७ शिक्षकांना अध्यापनासाठी वेळापत्रकाप्रमाणेच सतत तासिका मिळतात. तर १५ शिक्षकांना काहीवेळाच वेळापत्रकाप्रमाणे अध्यापनासाठी तासिका मिळतात.

पण १८ शिक्षकांना मात्र वेळापत्रकाप्रमाणे कधीच तासिका मिळत नाहीत. सतत काहीना काही अडचणीमुळे तासिका या वेळापत्रकाप्रमाणे मिळत नाहीत त्यामुळे त्या मागे – पुढे होतात.

**निष्कर्ष –**

यावरुन असा निष्कर्ष निघतो की जवळ – जवळ ४७% शिक्षकांना वेळापत्रकाप्रमाणे अध्यापनाच्या तासिका मिळत नाहीत.

## नियोजित तासिकांमध्ये तुमच्या विषयाचा पाठ्यक्रम शिकवून होतो का ?

### कोष्टक क्र. – ५.५६

### नियोजित तासिकांमध्ये विषय पाठ्यक्रम शिकवून होण्याबाबतच्या माहितीचे विश्लेषण

| अ.क्र. | प्रति.सादाचे स्वरुप | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | २६ | ३७.१४ |
| २. | नाही | ४४ | ६२.८६ |
| | एकूण | ७० | १०० |

**निरीक्षण –**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, नियोजित तासिकांमध्ये विषय पाठ्यक्रम शिकवून पूर्ण होतो असे २६(३७.१४%) शिक्षकांनी सांगितले तर ४४(६२.८६%) शिक्षकांनी सांगितले की नियोजित तासिकांमध्ये विषय पाठ्यक्रम शिकवून पूर्ण होत नाही.

**अर्थनिर्वचन –**

यावरुन असा अन्वयार्थ लावता येतो की, २६(३७.१४%) शिक्षकांचा स्वत:च्या विषयाचा पाठ्यक्रम शिकवून वेळेत पूर्ण होतो तर ४४(६२.८६%) शिक्षकांचा स्वत:च्या विषयाचा पाठ्यक्रम नियोजित तासिकांमध्ये शिकवून पूर्ण होत नाही. पाठ्यक्रम शिकवून पूर्ण करावा लागतो. पण तासिका कमी पडतात. त्यामुळे वेगळ्या उपाययोजना कराव्यात.

**निष्कर्ष –**

यावरुन असा निष्कर्ष निघतो की, जवळ-जवळ ६२.८६% शिक्षकांचा स्वत:च्या विषयाचा पाठ्यक्रम नियोजित वेळेत शिकवून पूर्ण होत नाही.

नियोजित तासिकांमध्ये तुमच्या विषयाचा पाठ्यक्रम शिकवून पूर्ण होत नसल्यास काय करता ?

**कोष्टक क्र. – ५.५७**

**पाठ्यक्रम पूर्ण करण्यासाठी केलेल्या उपाययोजनांच्या माहितीचे विश्लेषण**

| अ.क्र. | उपाय योजना | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | सेमिनार घेतो | २८ | ३९.९९ |
| २. | पाठ्यक्रम संपला असे घोषित करतो | १३ | १८.५७ |
| ३. | काहीच करत नाही. | २६ | ३७.१४ |
| ४. | इतर | ०३ | ४.२८ |
| | एकूण | ७० | १०० |

**निरीक्षण –**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, पाठ्यक्रम नियोजित तासिकामध्ये शिकवून पूर्ण होत नसल्यास २८(३९.९९%) शिक्षक सेमिनार घेतात. १३(१८.५९%) शिक्षक पाठ्यक्रम संपला असे घोषित करतात. २६(३७.१४%) शिक्षक काहीच करत नाहीत. तर ०३(४.२८%) शिक्षक इतर उपाययोजना करतात.

**अर्थनिर्वचन –**

यावरुन असा अन्वयार्थ लावता येतो की, पाठ्यक्रम नियोजित तासिकांमध्ये शिकवून पूर्ण होत नसल्यास २८ शिक्षक विद्यार्थ्यांना सेमिनार देतात. पण १३ शिक्षक हे पाठ्यक्रम संपला असे घोषित करुन स्वयंअभ्यास करण्यास सांगतात. तर २६ शिक्षक मात्र काहीच करत नाहीत. आणि अन्य ०३ शिक्षक हे त्यासाठी वेगळ्या उपाययोजना करुन पाठ्यक्रम पूर्ण करण्याचा प्रयत्न करतात.

**निष्कर्ष –**

यावरुन असा निष्कर्ष निघतो की पाठ्यक्रम नियोजित तासिकांमध्ये पूर्ण होत नसल्यास विद्यार्थ्यांना सेमिनार देतात पण ५६% शिक्षक काहीच करत नाहीत.

**इयत्ता १२ वी च्या विद्यार्थ्यांची बोर्डाच्या परीक्षेची तयारी कशाप्रकारे करता ?**

**कोष्टक क्र. – ५.५८**

**इ. १२ वी च्या विद्यार्थ्यांची बोर्डाच्या परीक्षेची तयारी करण्याबाबतच्या माहितीचे विश्लेषण**

| अ.क्र. | परीक्षेच्या तयारीसाठी उपाययोजना | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | ज्यादा तासिका घेतो | ४३ | ६१.४२ |
| २. | ज्यादा प्रश्नपत्रिका सोडवून घेतो | ३८ | ५४.२८ |
| ३. | सराव चाचण्या घेतो | २७ | ३८.५६ |
| ४. | कार्यशाळा | ०६ | ८.५७ |
| ५. | वरील सर्व | २४ | ३४.२८ |
| | एकूण | १३८ | |

(टीप – एकापेक्षा जास्त प्रति.साद काही शिक्षकांनी दिल्यामुळे प्रति.सादकांची संख्या ही ७० पेक्षा जास्त येते.)

**निरीक्षण –**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, इयत्ता १२ वीच्या विद्यार्थ्यांची बोर्डाच्या परीक्षेची तयारी कशाप्रकारे करता असे विचारले असता ४३(६१.४२%) शिक्षकांनी जादा तासिका घेतो असे उत्तर दिले. ३८(५४.२८%) शिक्षकांनी जादा प्रश्नपत्रिका सोडवून घेतो असे उत्तर दिले. २७(३८.५६%) शिक्षकांनी सराव चाचण्या घेतो असे उत्तर दिले. तर ०६(८.५७%) शिक्षकांनी कार्यशाळा घेतो असे उत्तर दिले व २४(३४.२८%) शिक्षकांनी वरील सर्व प्रकारे तयारी करुन घेतो असे सांगितले.

**अर्थनिर्वचन –**

यावरुन असा अन्वयार्थ लावता येतो की, इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांची बोर्डाच्या परीक्षेची तयारी जादा तासिका घेवून ६१.४२% शिक्षक करतात. ५४.२८% शिक्षक जादा प्रश्नपत्रिका सोडवून घेतात. तर ३८.५६% शिक्षक सराव चाचण्या घेवून तयारी करुन घेतात

आणि ३४.२८% शिक्षक हे जादा तासिका घेवून, जादा प्रश्नपत्रिका सोडवून घेवून, सराव चाचण्या घेवून, तसेच कार्यशाळा आयोजित करुन तयारी करुन घेतात.

**निष्कर्ष –**

इयत्ता १२ वी च्या विद्यार्थ्यांच्या बोर्ड परीक्षेची तयारी जादा तासिका घेवून, जादा प्रश्नपत्रिका सोडवून घेवून व सराव चाचण्या घेवून करून घेतली जाते.

**हुशार विद्यार्थ्यांसाठी वेगळ्या तासिका घेता काय ?**

**कोष्टक क्र. – ५.५९**

**हुशार विद्यार्थ्यांसाठी वेगळ्या तासिका घेण्याच्या माहितीच विश्लेषण**

| अ.क्र. | प्रति.सादाचे स्वरुप | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | नेहमी | २९ | ४१.४२ |
| २. | कधीतरी | ३५ | ४९.९९ |
| ३. | कधीच नाही | ०६ | ८.५७ |
| | एकूण | ७० | १०० |

**निरीक्षण –**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, हुशार विद्यार्थ्यांसाठी वेगळ्या तासिका २९(४१.४२%) शिक्षक नेहमी घेतात. ३५(४९.९९%) शिक्षक कधीतरी वेगळ्या तासिका घेतात. तर ०६(८.५७%) शिक्षक कधीच वेगळ्या तासिका घेत नाहीत.

**अर्थनिर्वचन –**

यावरुन असा अन्वयार्थ लावता येतो की, इयत्ता ११ वी व १२ वी च्या वर्गातील हुशार विद्यार्थ्यांसाठी जादा अध्यापन व मार्गदर्शनासाठी वेगळ्या तासिका ४१.४२% शिक्षक नेहमी घेतात. तर ४९.९९ % शिक्षक अशा तासिका अधून – मधून कधीतरी घेतात. पण ८.५७%

कधीच असा प्रयत्न करत नाहीत. वेगळ्या तासिका त्यांच्यासाठी घेवून त्यांच्या बुद्धीला अनुसरुन मार्गदर्शन करता येते.

**निष्कर्ष –**

यावरुन असा निष्कर्ष निघतो की, जवळ-जवळ ९१% शिक्षक हुशार विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनासाठी खास वेगळ्या तासिका घेतात. परंतु ०९% शिक्षक मात्र वेगळ्या तासिका घेत नाहीत.

**सेवांतर्गत प्रशिक्षण कार्यासाठी उद्‌बोधन वर्गासाठी तुम्हाला पाठवले जाते का ?**

**कोष्टक क्र. – ५.६०**

**सेवांतर्गत प्रशिक्षण कार्यासाठी उद्‌बोधन वर्गासाठी पाठवण्याबाबतच्या माहितीचे विश्लेषण**

| अ.क्र. | प्रति.सादाचे स्वरुप | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | नेहमी | २९ | ४१.४२ |
| २. | कधीतरी | २७ | ३८.५८ |
| ३. | कधीच नाही | १४ | १७.९९ |
| | एकूण | ७० | १०० |

**निरीक्षण –**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, सेवांतर्गत प्रशिक्षण कार्यासाठी व उद्‌बोधन वर्गासाठी २९(४१.४२%) शिक्षकांना नेहमी पाठवले जाते. २७(३८.५८%) शिक्षकांना कधीतरी पाठविले जाते. पण १४(१९.९९%) शिक्षकांना कधीच पाठवले जात नाही.

**अर्थनिर्वचन –**

यावरुन असा अन्वयार्थ लावता येतो की ४१.४२% शिक्षकांना नेहमी पाठवले जाते व ३८.५८% शिक्षकांना या वर्गासाठी अधून-मधून असे कधीतरी पाठवले जाते. मात्र १९.९९%

शिक्षकांना कधीच पाठवले जात नाही. उद्‌बोधन वर्ग आणि प्रशिक्षण कार्यशाळांमुळे शिक्षकांच्या अध्यापनात सुधार आणणे हा हेतू असतो.

**निष्कर्ष –**

यावरुन निष्कर्ष निघतो की, जवळ – जवळ ७८% शिक्षकांनाच उद्‌बोधन वर्ग व प्रशिक्षण कार्यशाळांसाठी पाठविले जाते. पण २०% शिक्षकांना पाठवले जात नाही.

**उद्‌बोधन वर्ग प्रशिक्षण कार्यशाळासाठी पाठवले जात असल्यास त्याचा काय परिणाम होतो ?**

**कोष्टक क्र. – ५.६१**

**उद्‌बोधन वर्ग प्रशिक्षण कार्यशाळासाठी पाठवले जात असल्यास होणाऱ्या परिणामाच्या माहितीचे विश्लेषण**

| अ.क्र. | प्रति.सादाचे स्वरुप | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | नविन विचारप्रवाहाची माहिती होते | १३ | १८.५७ |
| २. | अध्यापन कार्य सुधारते | २० | २९.५७ |
| ३. | वरील दोन्ही | ३७ | ५२.८५ |
| | एकूण | ७० | १०० |

**निरीक्षण –**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, उद्‌बोधन वर्ग व प्रशिक्षण कार्यशाळेसाठी पाठवले जात असल्यामुळे नवीन विचारप्रवाहांची माहिती होते असे १३(१८.५७%) शिक्षकांनी सांगितले तर २०(२९.५७%) शिक्षकांनी अध्यापन कार्य सुधारते असे सांगितले. तर ३७(५२.८५%) शिक्षकांनी सांगितले की नवीन विचारप्रवाहाची माहिती होते व अध्यापन कार्य सुधारते.

**अर्थनिर्वाचन –**

यावरुन असा अन्वयार्थ लावता येतो की, शिक्षकांना उद्‌बोधनवर्ग व प्रशिक्षण कार्यशाळांसाठी पाठवले असता नवीन विचार प्रवाह माहिती होतात असे १८.५७ % शिक्षकांचे मत आहे. तर अध्यापन कार्य सुधारते असे मत २९.५७% शिक्षकांचे आहे. व ५२.८५ % शिक्षकांच्या मतानुसार नवीन विचारप्रवाहाची माहिती होते आणि अध्यापन कार्य ही सुधारते. म्हणजेच उद्‌बोधन वर्ग व प्रशिक्षण कार्यशाळेस शिक्षकांना पाठवले असता त्याचा शिक्षकांना फायदा होतोच.

**निष्कर्ष –**

यावरुन असा निष्कर्ष निघतो की, शिक्षकांना प्रशिक्षण कार्यशाळा व उद्‌बोधन वर्गाला पाठविल्यामुळे त्यांचे अध्यापन कार्य सुधारते व नवनवीन विचारप्रवाहांची माहिती ही होते.

**आपल्या कनिष्ठ महाविद्यालयामध्ये अभ्यासपुरक उपक्रम राबवले जातात का ?**

**कोष्टक क्र. – ५.६२**

**अभ्यासपूरक उपक्रम राबवण्याबाबतच्या माहितीचे विश्लेषण**

| अ.क्र. | प्रति.सादाचे स्वरुप | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | नेहमी | ४८ | ६२.८५ |
| २. | कधी कधी | २२ | ३७.१५ |
| ३. | कधीच नाही | ०० | ०० |
| | एकूण | ७० | १०० |

**निरीक्षण –**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, कनिष्ठ महाविद्यालयामध्ये नेहमी अभ्यासपूरक उपक्रम राबवले जातात असे ४८(६२.८५%) शिक्षकांनी सांगितले की अभ्यासपूरक उपक्रम

कधी-कधी राबवले जातात तर कधीच राबवले जात नाहीत असे ००(००%) शिक्षकांनी सांगितले.

**अर्थनिर्वचन -**

यावरुन असा अन्वयार्थ लावता येतो की ४८ शिक्षकांच्या मतानुसार कनिष्ठ महाविद्यालयामध्ये अभ्यास पूरक उपक्रम सतत राबवले जातात तर २२ शिक्षकांच्या मतानुसार अभ्यासपूरक उपक्रम हे कधी-कधी राबवले जातात. अभ्यासक्रम पूरक उपक्रम राबवणे गरजेचे आहे.

**निष्कर्ष -**

कनिष्ठ महाविद्यालयामध्ये अभ्यासपूरक उपक्रम हे काही कॉलेज मध्ये नेहमी तर काही कॉलेजमध्ये कधी - कधी राबवले जातात.

**अभ्यासपूरक उपक्रम राबविले जात असल्यास त्याचे नियोजन कसे करता ?**

**कोष्टक क्र. - ५.६३**

**अभ्यासपूरक उपक्रम राबविण्यासाठी केलेल्या नियोजनाच्या माहितीचे विश्लेषण**

| अ.क्र. | नियोजनाचे स्वरुप | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | प्राचार्यांचे सहाय्य | ५१ | ७२.८५ |
| २. | सहकार्याशी चर्चा | ०५ | ७.१४ |
| ३. | विद्यार्थ्यांची मदत | १४ | १९.९९ |
| ४. | वरील सर्व | ४७ | ६७.१३ |
| | एकूण | ७० | १०० |

**निरीक्षण -**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, अभ्यास पूरक उपक्रम राबवत असताना ०७(९.९९%) शिक्षक प्राचार्यांचे सहाय्य घेवून नियोजन करतात. १२(१७.१४%) शिक्षक

सहकार्यांशी चर्चा करुन नियोजन करतात. विद्यार्थ्यांची मदत घेवून उपक्रमांचे नियोजन ०४(५.७१%) शिक्षक करतात तर ४७(६७.१३%) शिक्षक उपक्रमाचे नियोजन करताना प्राचार्यांचे सहाय्य, सहकार्यांशी चर्चा व विद्यार्थी मदत घेवून करतात.

**अर्थनिर्वचन –**

यावरुन असा अन्वयार्थ लावता येतो की, अभ्यासपूरक उपक्रम राबविण्याचे नियोजन करताना ०७ शिक्षक प्राचार्यांकडून मार्गदर्शन घेतात. तसेच १२ शिक्षक हे आपल्यातील इतर सहकार्यांशी चर्चा करतात. तर ०४ शिक्षक हे विद्यार्थ्यांची काही ठिकाणी मदत घेतात. मात्र ४७ शिक्षक हे नियोजन करताना प्राचार्यांचे मार्गदर्शन घेवून सहकार्यांशी चर्चा करुन व काही ठिकाणी विद्यार्थ्यांची मदत घेतात. म्हणजेच नियोजन करताना इतर अनेकांचे सहकार्य हे घ्यावे लागते.

**निष्कर्ष –**

अभ्यासक्रम पूरक उपक्रम राबवण्याचे नियोजन करत असताना शिक्षक हे प्राचार्यांचे सहाय्य व मार्गदर्शन घेवून इतर सहकार्यांशी चर्चा करतात व विद्यार्थ्यांचीही मदत घेतात.

**वेगवेगळ्या उपक्रमासंबंधी प्राचार्यांना मदत करता का ?**

**कोष्टक क्र. – ५.६४**

**वेगवेगळ्या उपक्रमासंबंधी प्राचार्यांना मदत करण्याबाबतच्या माहितीचे विश्लेषण**

| अ.क्र. | प्रति.सादाचे स्वरुप | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | सतत | ४१ | ५८.५७ |
| २. | काही वेळा | २१ | २९.९९ |
| ३. | कधीच नाही | ०८ | ११.४३ |
| | एकूण | ७० | १०० |

**निरीक्षण –**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, वेगवेगळ्या उपक्रांसंबंधी प्राचार्यांना मदत करता का असे विचारले असता ४१(५८.५७%) शिक्षकांनी सतत मदत करतो असे सांगितले. २१(२९.९९%) शिक्षकांनी काहीवेळा मदत करतो असे सांगितले तर प्राचार्यांना उपक्रमांसंबंधी कधीच मदत करत नाही असे ०८(११.४३%) शिक्षकांनी सांगितले.

**अर्थनिर्वचन –**

यावरुन असा अन्वयार्थ लावता येतो की, वेगवेगळ्या उपक्रमांसंबंधी प्राचार्य जेव्हा काम करतात तेव्हा ५८.५७% शिक्षक हे सतत मदत करतात आणि २९.९९ % शिक्षक हे प्राचार्यांना काहीवेळा मदत करतात. मात्र ११.४३% शिक्षक हे प्राचार्यांना उपक्रमसंबंधीत काहीही मदत करत नाहीत. उपक्रम पार पाडत असताना सर्वांच्या मदतीची सहभागाची अपेक्षा असते.

**निष्कर्ष –**

प्राचार्यांना उपक्रमासंबंधी कामात जवळ – जवळ ८८% शिक्षक हे मदत करतात.

**अभ्यासपूरक उपक्रम नियोजित वेळेतच घेतले जातात का ?**

**कोष्टक क्र. – ५.६५**

**अभ्यासपूरक उपक्रम घेण्याच्या वेळेविषयीच्या माहितीचे वर्गीकरण**

| अ.क्र. | प्रति.सादाचे स्वरुप | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | नेहमी वेळेतच | ५२ | ७४.२८ |
| २. | कधी कधी वेळेत | ०८ | ११.४२ |
| ३. | कधीच वेळेत नाही | १० | १४.२८ |
| | एकूण | ७० | १०० |

**निरीक्षण –**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, अभ्यास पूरक उपक्रम नियोजित वेळेतच घेतले जातात का असा प्रश्न विचारला असता ५२(७४.२९%) शिक्षकांनी नेहमी वेळेतच घेतले जातात असे उत्तर दिले ०८(११.४२%) शिक्षकांनी उत्तर दिले की कधी – कधी तरी वेळेत घेतले जातात. तर १०(१४.२८%) शिक्षकांनी उत्तर दिले की अभ्यासपूरक उपक्रम कधीच वेळेत घेतले जात नाहीत.

**अन्वयार्थ –**

वरील माहितीवरून असा अन्वयार्थ लावता येतो की, अभ्यासपूरक उपक्रम नेहमी वेळेतच घेतले जातात असे ७४.२८% शिक्षकांनी सांगितले. ११.४२ % शिक्षकांनी हे उपक्रम काहीवेळाच वेळेत घेतले जातात असे सांगितले. मात्र १४.२८% शिक्षकांच्या सांगण्यानुसार अभ्यासपूरक उपक्रम हे कधीच वेळेत घेतले जात नाहीत.

**निष्कर्ष –**

अभ्यासपूरक उपक्रम हे १४.२८% शिक्षकांच्या मते कधीच वेळेत घेतले जात नाहीत. तर ८५.७२% शिक्षकांच्या मते वेळेत घेतले जातात.

**कनिष्ठ महाविद्यालय माध्यमिक शाळेला जोडून असल्यास तुम्हाला माध्यमिक शाळेत तासिका घ्याव्या लागतात का ?**

**कोष्टक क्र. – ५.६६**

**शिक्षकांच्या तासिकेच्या माहितीचे विश्लेषण**

| अ.क्र. | प्रति.सादाचे स्वरुप | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | नेहमी | ०० | ०० |
| २. | कधी–कधी | ०४ | ५.७२ |
| ३. | कधीच नाही | ६६ | ९४.२८ |
| | एकूण | ७० | १०० |

**निरीक्षण –**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की माध्यमिक शाळेला जोडून कनिष्ठ महाविद्यालय असता माध्यमिक शाळेत तासिका नेहमी घ्याव्या लागतात असे ००(००%) शिक्षकांनी उत्तर दिले. ०४(५.७२%) शिक्षकांनी कधी-कधी घ्याव्या लागतात असे उत्तर दिले तर ६६(९४.२८%) शिक्षकांनी कधीच नाही असे उत्तर दिले.

**अर्थनिर्वचन –**

यावरुंन असा अन्वयार्थ लावता येतो की, जरी माध्यमिक शाळेला जोडून कनिष्ठ महाविद्यालय असले तर फक्त ५.७२% शिक्षकांना माध्यमिकच्या वर्गावर कधीतरी तासिका घ्याव्या लागतात. पण ९४.२८% शिक्षकांना कधीच तासिका घ्याव्या लागत नाहीत. म्हणजेच ज्या त्या विभागासाठी स्वतंत्र शिक्षक वर्ग आहे.

**निष्कर्ष –**

माध्यमिकच्या वर्गावर फक्त ५.७२% शिक्षकांना कधीतरी तासिका घ्यावी लागते. पण ९४.२८% शिक्षकांना कधीच नाही.

**कनिष्ठ महाविद्यालय वरिष्ठ महाविद्यालयास जोडून असल्यास तुम्हाला वरिष्ठ महाविद्यालयीन वर्गावर तासिका घ्याव्या लागतात का ?**

**कोष्टक क्र. – ५.६७**

**कनिष्ठ महाविद्यालय वरिष्ठ महाविद्यालय जोडून असल्यास वरिष्ठ महाविद्यालयातील वर्गावर तासिकांच्या बाबतच्या माहितीचे विश्लेषण**

| अ.क्र. | प्रति.सादाचे स्वरुप | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | नेहमी | ०० | ०० |
| २. | नाही | ७० | ०० |
| ३. | कधी-कधी | ०० | ०० |
| | एकूण | ७० | १०० |

**निरीक्षण –**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, वरिष्ठ महाविद्यालयास जोडून कनिष्ठ महाविद्यालय असल्यास ००(००%) शिक्षकांना नेहमी तासिका वरिष्ठ महाविद्यालयावर घ्याव्या लागतात. तर ७०(१००%) शिक्षकांना कधीच घ्याव्या लागत नाही असे उत्तर दिले.

**अर्थनिर्वचन –**

यावरुन असा अन्वयार्थ लावता येतो की, कनिष्ठ महाविद्यालय जरी वरिष्ठ महाविद्यालयाला संलग्न असले तरी कनिष्ठ महाविद्यालयाच्या एकाही शिक्षकाला वरिष्ठ वर्गावर तास घ्यावे लागत नाहीत. म्हणजेच प्रत्येक विभाग स्वतंत्र असल्याने कामाचा ताण नाही.

**निष्कर्ष –**

वरिष्ठ महाविद्यालयातील वर्गावर एकाही कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकाला तास घ्यावा लागत नाही.

**वरिष्ठ महाविद्यालय अथवा माध्यमिक शाळेत तासिका घ्याव्या लागत असल्यास त्याचा कनिष्ठ महाविद्यालयीन विषयाच्या अध्यापनावर परिणाम होतो का ?**

**कोष्टक क्र. – ५.६८**

**वरिष्ठ महाविद्यालय / माध्यमिक शाळेत तासिका घ्याव्या लागत असल्यास कनिष्ठ महाविद्यालयीन विषयाचा अध्यापनावर होणाऱ्या परिणामाचे विश्लेषण**

| अ.क्र. | प्रति.सादाचे स्वरुप | प्रति.सादक संख्या | प्रति. शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | नेहमी | ०० | ०० |
| २. | कधीच नाही | ६६ | ९४.२८ |
| ३. | कधी–कधी | ०४ | ५.७२ |
| | एकूण | ७० | १०० |

**निरीक्षण -**

वरील कोष्टकावरुन असे दिसून येते की, वरिष्ठ अथवा माध्यमिकच्या वर्गावर तासिका घ्याव्या लागत असल्यास त्याचा परिणाम कनिष्ठ महाविद्यालयाच्या विषयावर नेहमी होतो असे ००(००%) शिक्षकांनी उत्तर दिले. ६६(९४.२८%) शिक्षकांनी कधीच नाही असे उत्तर दिले. तर ०४(५.७२%) शिक्षकांनी कधी - कधी होतो असे उत्तर दिले.

**अर्थनिर्वचन -**

यावरुन असा अन्वयार्थ लावता येतो की, वरिष्ठ किंवा माध्यमिकच्या वर्गावर तासिका घ्याव्या लागत असल्यास त्याचा परिणाम कनिष्ठ महाविद्यालयाच्या विषय अध्यापनावर होतो असे फक्त ५.७२% शिक्षकांचे मत आहे. तर ९४.२८% शिक्षक हे अनुत्तरीत आहेत. म्हणजेच तासिका घ्याव्याच लागत नाहीत. त्यामुळे परिणाम होतच नाही.

**निष्कर्ष -**

यावरुन असा निष्कर्ष निघतो की, ज्यांना वरिष्ठ किंवा माध्यमिकच्या वर्गावर घ्याव्या लागतात त्यांच्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या विषय अध्यापनावर काही प्रमाणात परिणाम होतो.